


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




✲ वर्ष ६५ वे ✲ अंक १३५ ✲ नांदेड ✲ शुक्रवार, दि. २२ मे २०२६ ✲ पृष्ठे ६ ✲ किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## ‘नीट’ पेपरफुटीप्रकरणी सीबीआयची कारवाई सुरूच

# लातूरचे बालरोग तज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरेला पुण्यातून अटक




**लातूर (प्रतिनिधी)–** देशभरात खळबळ उडवणाऱ्या ‘नीट’ पेपरफुटी प्रकरणात पुण्यातून आणखी एका आरोपीला सीबीआयकडून अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेला हा आरोपी बालरोगतज्ज्ञ असून डॉ. मनोज शिरुरे असं त्याच नाव आहे.

लातूर शहरात ‘नीट’ पेपरफुटी प्रकरणात सीबीआयची कारवाई आणखी वेगाने सुरू असून, आरसीसी कोचिंग क्लासेसचा संचालक शिवराज मोटेगावकर याच्या नेटवर्कमधील संशयितांवर तपास यंत्रणांचे लक्ष केंद्रीत झाले आहे. रविवारीपासून लातूरमध्ये तळ ठोकून असलेल्या सीबीआय पथकाने बुधवारी संध्याकाळी जुना औसा रोड परिसरातील सिद्धिविनायक बाल रुग्णालय येथे पोहोचले. हे रुग्णालय बालरोग तज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरे यांचे आहे. फुटलेला ‘नीट’ पेपर विकत घेतल्याच्या संशयावरून त्यांची तब्बल साडेचार तास कसून चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान काही कागदपत्रे, मोबाईल आणि डिजीटल पुरावे सीबीआयने ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. सीबीआयच्या प्राथमिक तपासात डॉ. शिरुरे हे शिवराज मोटेगावकर आणि पी. व्ही. कुलकर्णी यांच्या संपर्कात असल्याचे समोर आले आहे. मागील काही वर्षांपासून ते पेपरफुटीच्या नेटवर्कमध्ये सहभागी असल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे.

### अंबाजोगाईतील शिक्षिका आईसह बहीण-भावाची सीबीआयकडून चौकशी

‘नीट’ पेपरफुटी प्रकरणात आता बीड आणि लातूर कनेक्शन अधिक गडद होताना दिसत आहे. अंबाजोगाईतील दोन विद्यार्थ्यांची आणि त्यांच्या शिक्षिका आईची केंद्रीय अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) तब्बल सव्वादोन तास कसून चौकशी करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. चौकशी करण्यात आलेले हे दोन्ही बहीण-भाऊ लातूरमध्ये शिक्षण घेत होते. यापैकी बहीण रिपीटर विद्यार्थिनी असून ती पुन्हा ‘नीट’ परीक्षा देत होती. तर भाऊ पहिल्यांदाच परीक्षेला बसला होता. हा पेपर या दोघांसाठीच घेण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

# नांदेड जिल्ह्यात पेट्रोल, डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध

## नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहरातील काही पेट्रोल पंपांवर पेट्रोल संपल्याबाबतच्या अफवा सोशल मीडियावर पसरत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. यामुळे नागरिकांमध्ये विनाकारण भीती व गोंधळ निर्माण होऊन पेट्रोल पंपांवर मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. मात्र नांदेड शहर तसेच जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा आणि नियमितपणे पुरवठा होत आहे. अचानकपणे डिझेलच्या मागणीत २५-३० टक्के वाढ झाल्याने, पॅनिक खरेदी होत असल्याने टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे, असा स्पष्ट खुलासा जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी केला आहे.

जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, इंधन पुरवठा साखळी पूर्णपणे सुरळीत सुरू असून संबंधित यंत्रणेमार्फत यावर सातत्याने देखरेख ठेवली जात आहे. गुरूवार, दि. २१ मे २०२६ रोजीच्या उपलब्ध आकडेवारीनुसार जिल्ह्यात एकूण १ हजार ९५१ केएल पेट्रोल आणि २ हजार ७९ केएल डिझेलचा साठा उपलब्ध आहे.

नागरिकांनी कोणत्याही अप्रमाणित अफवा, सोशल मीडियावरील चुकीचे संदेश किंवा माहितीवर नागरिकांनी विश्वास ठेवू नये. भीतीपोटी किंवा एकाच वेळी जास्त प्रमाणात पेट्रोल/डिझेल खरेदी करून साठवणूक करण्याचा प्रयत्न करू नये. पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी टाळावी, ज्यामुळे वाहतूक कोंडी किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही. अफवा पसरविणे किंवा चुकीची माहिती प्रसारित करणे हा कायद्याने दंडनीय अपराध असून, अशा कृत्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल. नागरिकांना कोणतीही शंका असल्यास केवळ अधिकृत शासकीय माध्यमांद्वारेच माहिती घ्यावी, असे सांगण्यात आले आहे.

नागरिकांनी शांतता, संयम व सहकार्य राखावे. सर्वांच्या सहकार्याने कोणतीही अनुचित परिस्थिती निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. जिल्ह्यात निर्माण झालेल्या इंधन समस्येविषयी आढावा बैठकीत त्यांनी नागरिकांना आवाहन केले.

याप्रसंगी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हा कृषी अधिक्षक, तेल कंपनीचे विक्री अधिकारी उपस्थित होते. तसेच सर्व क्षेत्रीय अधिकारी व्हिसीद्वारे उपस्थित होते.

**तालुकास्तरावरील संपर्क क्रमांक :** नांदेड- ७०३०७ ७३०४०, अर्धापूर- ८८०५० ६८९५४, मुखेड- ९३५६८ ०६४०५, धर्माबाद- ९४२१८ ४१४४७, मुदखेड- ९४४५१ १२७८२, उमरी- ८८०५४ ४७८३७, बिलोली- ९६३७९ ६३२२२, लोहा- ९३५६८ ०६४०५, हिमायतनगर- ८३०८० ७३०८९, हदगाव- ८८०५० ६८९५४, कंधार- ९८२३७ ५७३४५, माहूर - ९४०३१ ८४४७३, किनवट- ९८५०२ ९६०९६, भोकर- ८४२११ ८३६०२, देगलूर- ९४२३८ ०५०६४, नायगाव- ७०५७० ०२८६५ याप्रमाणे आहेत.

## डॉ. सुरेश सावंत यांना पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेचा ग.ह. पाटील पुरस्कार



**नांदेड (प्रतिनिधी)–** ज्येष्ठ बालसाहित्यकार तथा शिक्षणतज्ज्ञ डॉ. सुरेश सावंत यांना पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेचा डॉ. मंदा खांडगे पुरस्कृत ग. ह. पाटील पुरस्कार जाहीर झाला आहे. ज्येष्ठ कवी तथा शिक्षणतज्ज्ञ ग. ह. पाटील यांच्या स्मरणार्थ दरवर्षी एका ज्येष्ठ साहित्यिकाला बालसाहित्यातील अनमोलयोगदानासाठी हा पुरस्कार देण्यात येतो. येत्या २६ मे रोजी पुण्यात बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित एका विशेष समारंभात डॉ. सावंत यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

डॉ. सावंत यांची आजवर ६० पुस्तके प्रकाशित झाली असून त्यापैकी ३५ पुस्तके बालसाहित्याची आहेत. त्यांना साहित्य अकादमीच्या पुरस्कारासह महाराष्ट्र शासनाचे तीन पुरस्कार आणि अन्य प्रतिष्ठित साहित्यसंस्थांचे ४५ पुरस्कार मिळाले आहेत. शिक्षणक्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना राष्ट्रपती पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. नांदेड जिल्हा परिषदेचा नरहर कुरुंदकर पुरस्कार आणि दै. सत्यप्रभाचा सौ. कुसुमताई शंकरराव चव्हाण जीवनगौरव पुरस्कार त्यांना मिळाला आहे. पुणे येथील अ. भा. मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या जीवनगौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. डॉ. सावंत यांचे साहित्य शालेय तसेच विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत समाविष्ट झाले आहे. त्यांच्या एकूण बालकवितेवर संशोधन करून एका विद्यार्थ्याने एम. फिल. ही पदवी संपादन केली आहे. अनेक विद्यापीठांत त्यांच्या बालसाहित्यावर संशोधन होत आहे.

डॉ. सुरेश सावंत यांची वाचनसंस्कृती लेखनसंस्कृती, बालसाहित्य आणि बालशिक्षणाचा अनुबंध, आजची मराठी बालकविता, आणि बालसाहित्यातील नवे काही ही पुस्तके संदर्भग्रंथ म्हणून अभ्यासकांसाठी अतिशय उपयुक्त ठरली आहेत. डॉ. सावंत यांनी कुंटूर, जळगाव आणि पैठण येथे संपन्न झालेल्या बालकुमार साहित्य संमेलनांचे, तसेच पळसप (जि. धाराशिव) येथे झालेल्या मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले आहे. डॉ. सावंत यांनी १४५ पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या आहेत किंवा पाठराखण केली आहे. अलीकडेच त्यांच्या साहित्याविषयी राजगुरुनगर येथील प्राचार्य साईनाथ पाचारणे यांनी ‘डॉ. सुरेश सावंत यांची बालकविता : आशय, शैली आणि समीक्षा’ हा ग्रंथ लिहिला आहे.

## ३० जुनपूर्वी कर्जमाफीची घोषणा; मुख्यमंत्री फडणवीस यांची माहिती

**मुंबई (प्रतिनिधी)–** येत्या ३० जून पूर्वी सर्व शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. त्यामुळे पुढच्या हंगामासाठी या शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा असेल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तसेच राष्ट्रीयकृत बँकांनी त्यांचे कृषी संदर्भातील ८० टक्के कर्जवितरणाचे टार्गेट पूर्ण करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

राज्य सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीची योजना जाहीर केली आहे. पण ती नेमकी कधी होणार याची नेमकी माहिती मात्र समोर आली नव्हती. त्यावरून शेतकरी आणि बँकांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झाली होती. तसचे विरोधकांनीही सरकारवर टीका सुरू केली होती. त्यानंतर ही कर्जमाफी ३० जूनच्या आधी करण्याची मोठी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली.

राज्याच्या खरीप हंगामाची पूर्वतयारीची बैठक घेतली. त्या आधी बँकर्ससोबत कर्जवाटपासंदर्भात बैठक झाली. त्यामध्ये अधिकाधिक शेतकऱ्यांना कर्ज कसं मिळेल यांची तजवीज करण्यात आली. जिल्हा सहकारी आणि ग्रामीण बँक मिळून ६७ टक्के कर्ज दिलं जातं तर २६ टक्के कर्ज हे इतर राष्ट्रीयकृत बँकांकडून देण्यात येतय. परंतु राष्ट्रीयकृत बँकांकडून त्यांचे ८० टक्के कर्जवितरणाचं टार्गेट पूर्ण होत नाही, ते त्यांनी पूर्ण केलं पाहिजे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

## जिल्ह्यात काही पेट्रोल पंपावर डिझेलची टंचाई; वाहनधारकांसह ट्रॅक्टरधारक शेतकरीही अडचणीत

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहर व जिल्ह्यात पुन्हा एकदा काही ठिकाणी डिझेलची टंचाई निर्माण झाल्याचे चित्र दिसत असून अनेक पेट्रोल पंपांवर डिझेल उपलब्ध नसल्याचे फलक दिसून येत असून यामुळे वाहनधारकांसह शेतकरी अडचणीत आले आहे.

जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून डिझेल टंचाई भासत आहे. यामुळे सर्व शेतकरी तसेच वाहनधारक त्रस्त झाले आहेत. आता हे लोण जिल्हाभरात पोहंचले आहे. बुधवारपासून जिल्ह्यातील पेट्रोल पंपावर नो डिझेलचे बोर्ड लागले आहेत. सध्या शेतीचा हंगाम सुरु असून, पेरणीपूर्व मशागतीची तयारी सुरु आहे. जिल्ह्यातील नांदेड, अर्धापूर, मुदखेड, लोहा, कंधार, भोकर, किनवट, माहूर या तालुक्यांत मोठ्या प्रमाणात टंचाई निर्माण झाली आहे. ट्रॅक्टरव्दारे पेरणी करण्यासाठी जमिनीची नांगरणी व लेव्हलींग सुरु आहे. तसेच हळद आणि उसाचे पिक काढल्यानंतर जमिनीला पलटी मारण्याचे काम सुरु आहे. मात्र काल सायंकाळपासून जिल्ह्यातील ७० टक्के पेट्रोल पंपावर डिझेल उपलब्ध नसल्याने कॅन घेऊन शेतकरी रांगेत उभे आहेत. काही ठिकाणी पेट्रोल पंपावर मोठ्या प्रमाणात ट्रॅक्टर चालक उभे असून, चारचाकी वाहनांना देखील डिझेल मिळत नाही. भोकर तालुक्यातील ६० टक्के पेट्रोल पंपावर डिझेल उपलब्ध नसल्याच्या पाट्या लागल्या असून, डिझेलचे टँकर येण्याची वाट बघत शेतकरी रात्रीपासून थांबले आहेत. सोनारी, भोकर, बारड, पिंपळगाव, पार्टी, अर्धापूर, मुदखेड, नायगाव आणि नांदेड तालुक्यातील तसेच लोहा व कंधार तालुक्यातील अनेक पंपावर डिझेल उपलब्ध नाही.

ऐन पेरणीच्या हंगामाच्यावेळी डिझेलची टंचाई निर्माण झाल्याने शेतकरी त्रस्त आहेत. याबाबत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले की, लोक पॅनिक झाले असून, स्टॉक करुन घेण्याची घाई ग्राहकांना लागली असल्याने ही टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे कोणीही स्टॉक जमा करू नये, जिल्ह्यात पुरेसा डिझेल साठा आहे, असे त्यांनी सांगितले.

# नांदेड रेल्वे स्थानकावर रेल्वे डब्याला आग; फायर ब्रिगेडच्या बंबांनी आग विझवली






**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकावर असलेल्या एका रिकाम्या डब्याला गुरुवार, दि. २१ मे रोजी सकाळी ६ वाजेच्या सुमारास अचानक आग लागली. या आगीत अग्निशमन दलाचे बंब पोहोचण्यापूर्वीच रेल्वे डबा जळून खाक झाला. विशेष म्हणजे हा रिकामा डबा स्टेशनपासून काही अंतरावर दूर असल्याने मोठा अनर्थ टळला असे रेल्वे विभागाने सांगितले.

येथील हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकाहून दररोज हजारो प्रवाशांची ये-जा होत असते. एक मोठे शहर आणि शिख धर्मियांची दक्षिण काशी अशी नांदेडची ओळख आहे. यामुळे रेल्वेस्थानकाची व्याप्ती आणि सुविधा वाढविण्यात आल्या आहेत. दिवसभरातील रेल्वे वाहतूक पाहता मुख्य स्थानकाच्या बाजूला अतिरिक्त व दुरूस्तीसाठी स्टेबल लाईनवर असे कोच ठेवले जातात. दि. २१ मे रोजी सकाळच्या सुमारास प्लॅटफॉर्म लाईनपासून काही अंतरावर उभ्या असलेल्या रिकाम्या रेल्वे कोचला अचानक आग लागली. उष्णतेमुळे अवघ्या काही वेळात या आगीने रौद्ररूप धारण केले. तेव्हा काहीवेळ धावपळ उडाली. घटनेची माहिती मिळताच रेल्वे प्रशासनाने तातडीने हालचाल करत अग्निशमन व संबंधित यंत्रणांच्या मदतीने आग आटोक्यात आणली. यामुळे घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा प्रवाशांना दुखापत झालेली नाही. आग लागलेला कोच रिकामा असल्याने संभाव्य मोठी दुर्घटना टळली. दरम्यान, नेमकी आग कशामुळे लागली याचा शोध घेण्याचे काम रेल्वे प्रशासनाकडून सुरू आहे.

## कॉकरोच जनता पार्टीचे ट्वीटर अकाऊंट थेट सस्पेंड!

**मुंबई (प्रतिनिधी)–** सध्या सगळीकडे कॉकरोच जनता पार्टीची चर्चा आहे. या इंस्टाग्राम अकाउंटचा संस्थापक एक मराठी तरुण आहे. एका सोशल मीडिया कॅम्पेनद्वारे सध्या अभिजीत दीपके चर्चेत आले आहेत. अभिजीत हे महाराष्ट्रातील आहेत. त्यांनी सोशल मीडियावर कॉक्रोच जनता पार्टी स्थापन केली आणि त्यांना रातोरात प्रसिद्धी मिळाली. पाच दिवसांत त्यांच्या इन्स्टाग्रामवर १० मिलियनहून अधिक फॉलोअर्स झाले आहेत. मात्र या पार्टीचे ट्विटर खाते सध्या सस्पेंड करण्यात आले आहे. अभिजीत दीपके हे सध्या सोशल मीडिया सेन्सेशन बनले आहेत. त्यांनी कॉक्रोच जनता पार्टीची स्थापना केली आहे. या पार्टीच्या माध्यमातून त्यांनी बेरोजगारी आणि सिस्टीमवर सवाल उपस्थित करणारे मीम्स व्हायरल केले आहेत.




## रेल्वे भरती आंदोलन प्रकरणात राज ठाकरे निर्दोष मुक्तता

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज ठाकरे यांना २००८ मधील रेल्वे भरती हिंसाचार प्रकरणी निर्दोष मुक्त करण्यात आलं आहे. पुराव्यांअभावी राज ठाकरे यांच्यासह इतर सहकाऱ्यांचीही निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. ठाणे कोर्टाने हा मोठा निर्णय दिला आहे. आज निकालाचं वाचन करताना कोर्टाने हा महत्त्वाचा निर्णय दिला आहे. त्यामुळे मनसेमध्ये जल्लोषाचं वातावरण निर्माण झालं आहे. सन २००८ मध्ये मुंबई आणि ठाणे परिसरामध्ये रेल्वे भरतीच्या परीक्षा आयोजित करण्यात आल्या होत्या. या भरती प्रक्रियेत महाराष्ट्राबाहेरील (परप्रांतीय) उमेदवारांना मोठ्या प्रमाणावर बोलावण्यात आल्याचा आरोप करत मनसेने ‘मराठी मुळांच्या’ हक्कासाठी तीव्र आंदोलन छेडले होते.

# गटबाजीवर काँग्रेसचा उतारा; दक्षिण जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी खासदारांकडे!

### ✦ उत्तर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सक्रिय विठ्ठल पावडेंकडे!
### ✦ महानगर अध्यक्षपदासाठी मुस्लिम चेहऱ्याची निवड



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहर आणि जिल्ह्यात जिल्हाध्यक्षपद निवडीवरून मोठ्या गटबाजीला सुरुवात झालेली होती. यानंतर पक्षाने काँग्रेसचे खासदार प्रा. रवींद्र चव्हाण यांच्यावरच दक्षिण जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली असून उत्तर भागातील सक्रिय असणारे विठ्ठल पावडे यांच्यावर उत्तर जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

त्याचबरोबर काँग्रेसच्या महानगर अध्यक्षपदी पुन्हा मुस्लिम चेहरा देण्यात आला असून मावळते अध्यक्ष अब्दुल सत्तार यांचे पुत्र गफार यांच्यावर महानगर अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. यात एम. आय. एम. चा वाढता प्रभाव रोखण्याचे धोरणही दिसून येत आहे.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या संघटन सृजन अभियानांतर्गत जिल्ह्यामध्ये सर्व कार्यकर्त्यांचे, पदाधिकाऱ्यांचे मत जाणून घेत सर्व्हे करण्यात आला होता. त्यानंतर अखेर जिल्हा आणि शहर काँग्रेस कमिटीमध्ये अपेक्षेप्रमाणे मोठे बदल करण्यात आले. पक्षात उफाळून आलेली प्रचंड गटबाजी, अंतर्गत बेबनाव आणि पदाधिकाऱ्यांमधील समन्वयाच्या अभावाला चाप लावण्यासाठी पक्ष श्रेष्ठ कारवाईचा बडगा उगारला होता. दोन्ही विद्यमान जिल्हाध्यक्षांना बदलण्यात आले असून नव्या जिल्हाध्यक्षपदाचे नाव घोषित करण्यात आली आहेत. यात नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी खुद्द खासदार रवींद्र चव्हाण यांच्याकडे आणि नांदेड उत्तरची जबाबदारी डॉ. विठ्ठल पावडे यांच्या खांद्यावर टाकण्यात आली, तर महानगर शहराध्यक्ष म्हणून नगरसेवक अब्दुल गफार यांना संधी देण्यात आली आहे.

विद्यमान जिल्हाध्यक्ष हनुमंत पाटील बेटमोगरेकर आणि राजेश पावडे यासोबतच शहराध्यक्ष अब्दुल सत्तार हे जिल्ह्यातील नगरपंचायत, नगरपरिषद आणि महानगरपालिका निवडणुकीमध्ये पक्षाला यश मिळवून देण्यात यशस्वी ठरले नाहीत. त्यातल्या त्यात काँग्रेसमध्ये अंतर्गत बंडाळी मोठ्या प्रमाणात वाढली होती. जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांच्या तक्रारी थेट प्रदेशाध्यक्षापर्यंत पोहोचल्या होत्या. त्यानंतर अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने संघटन सृजन अभियान सुरू करण्यात आले. या अभियानांतर्गत मोठ्या प्रमाणात काँग्रेसमध्ये फेरबदल करण्यात आले. देशभरात काँग्रेस बळकट करण्यासाठी संघटन मजबूत असणे आवश्यक आहे. महिनाभरापूर्वी पक्षनिरीक्षक वेणुगोपाल राव, रवींद्र दळवी यांच्यासह राज्यातील प्रमुख नेत्यांनी नांदेडच्या एका चिंतन सभेमध्ये पदाधिकाऱ्यांचे, कार्यकर्त्यांचे मत जाणून घेतले होते. इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. काही स्थानिक नेत्यांनी मोठे शक्ती प्रदर्शनही केले होते.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकल जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# विद्यार्थ्यांच्या आत्महत्या : राष्ट्राची हानी

देशात दररोज सरासरी ४० विद्यार्थी आत्महत्या करत आहेत, ही केवळ आकडेवारी नाही तर संपूर्ण समाजव्यवस्थेला हादरवून टाकणारी शोकांतिका आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या अहवालानुसार २०२४ मध्ये तब्बल १४,४८८ विद्यार्थ्यांनी जीवन संपवले. देशाच्या भविष्यासाठी घडणारी तरुण पिढी मानसिक तणावाच्या इतक्या खोल गर्तेत जाईल याची कल्पनाही काही वर्षांपूर्वी कोणी केली नव्हती. शिक्षण, करिअर, स्पर्धा आणि अपेक्षांचे ओझे विद्यार्थ्यांच्या आयुष्यावर इतके जड झाले आहे की, अनेकांना जगण्यापेक्षा मृत्यू सोपा वाटू लागला आहे. ही स्थिती केवळ चिंताजनक नाही, तर राष्ट्रीय आपत्ती मानण्यासारखी आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्यां- मध्ये गेल्या दशकात ६५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. २०१३ मध्ये ८ हजारांपेक्षा थोडी अधिक असलेली संख्या आता जवळपास १५ हजारांवर पोहोचली आहे. याचा अर्थ असा की, देशातील तरुण मनं अधिक असुरक्षित, अस्थिर आणि तणावग्रस्त होत चालली आहेत. विशेषतः महाराष्ट्र या यादीत सर्वांत पुढे असल्याची बाब अधिक धक्कादायक आहे. शिक्षण आणि औद्योगिक प्रगतीत अग्रस्थानी असलेले राज्य मानसिक आरोग्याच्या बाबतीत इतके मागे का पडले, हा प्रश्न आता गांभीर्याने विचारण्याची वेळ आली आहे. आजचे शिक्षण केवळ ज्ञान देण्याचे माध्यम राहिलेले नाही, तर ते गुण, रँक, स्पर्धा आणि करिअरच्या अतिरेकी धावपळीचे केंद्र बनले आहे. लहान वयातच मुलांवर यशस्वी होण्याचा प्रचंड दबाव टाकला जातो. पालकांच्या अपेक्षा, समाजाची तुलना, कोचिंग क्लासेसची स्पर्धा आणि सोशल मीडियावर निर्माण होणारे यशाचे कृत्रिम चित्र यामुळे विद्यार्थी सतत मानसिक तणावाखाली जगत आहेत. पहिले यायलाच हवे, मोठ्या पगाराची नोकरी मिळवायलाच हवी, अपयश म्हणजे आयुष्य संपले अशा मानसिकतेने अनेक तरुणांचे आयुष्य पोखरून टाकले आहे. त्यात पुन्हा 'नीट'सारख्या महत्त्वाच्या परीक्षेची प्रश्नपत्रिकाच विक्री होत आहे. यामुळे गरीब व हुशार विद्यार्थ्यांवर प्रचंड अन्याय होतो. नुकत्याच झालेल्या नीट प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणामुळे काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आहे. १८ वर्षांखालील मुलांमध्ये परीक्षेत अपयश हे आत्महत्ये- मागील मोठे कारण ठरले आहे. केवळ परीक्षेत कमी गुण मिळाले किंवा अपेक्षित निकाल लागला नाही म्हणून हजारो विद्यार्थी मृत्यूला कवटाळत असतील, तर आपल्या शिक्षण व्यवस्थेच्या मूल्यांवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहते. शिक्षणाचा उद्देश विद्यार्थ्यांना सक्षम आणि आत्मविश्वासी बनवण्याचा असतो; परंतु आजची व्यवस्था त्यांना भीती, असुरक्षितता आणि नैराश्य देत आहे. या परिस्थितीसाठी केवळ विद्यार्थी जबाबदार नाहीत. पालक, शिक्षणसंस्था, समाज आणि शासन यांचीही तितकीच जबाबदारी आहे. अनेक पालक नकळत आपल्या अपूर्ण स्वप्नांचे ओझे मुलांवर टाकतात. मुलांच्या आवडी-निवडी समजून घेण्याऐवजी त्यांना ठरावीक साच्यात बसवण्याचा प्रयत्न केला जातो. दुसरीकडे शाळा आणि महाविद्यालयांमध्ये मानसिक आरोग्याविषयी आवश्यक ते मार्गदर्शन आणि समुपदेशन उपलब्ध नाही. विद्यार्थ्यांच्या भावनिक अडचणींकडे दुर्लक्ष केले जाते. अनेकदा नैराश्य, भीती किंवा एकटेपणाची लक्षणे वेळेत ओळखली जात नाहीत. विद्यार्थ्यांच्या आत्महत्या हा केवळ वैयक्तिक दुःखाचा विषय नाही, तर तो देशाच्या बौद्धिक शक्तीच्या ऱ्हासाचाही प्रश्न आहे. देशाची प्रगती तरुणांच्या बुद्धिमत्ता, कौशल्य आणि ऊर्जेवर अवलंबून असते. जे विद्यार्थी उद्याचे शास्त्रज्ञ, डॉक्टर, अभियंते, शिक्षक किंवा प्रशासक होऊ शकले असते, तीच तरुण मनं आज अकाली संपत आहेत. म्हणजेच देशाला चालना देणारी सर्वांत महत्त्वाची शक्ती आपण गमावत आहोत. आत्महत्या करणारा प्रत्येक विद्यार्थी हा राष्ट्राच्या भविष्यातील एक तारा असतो, जो वेळेआधीच विझून जातो. या गंभीर समस्येकडे केवळ आकडेवारी म्हणून पाहून चालणार नाही. शिक्षण व्यवस्थेत मूलभूत बदल करण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांवर असलेला गुणांचा अतिरेक कमी करून कौशल्य, सर्जनशीलता आणि व्यक्तिमत्त्व विकासाला प्राधान्य द्यावे लागेल. प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयात समुपदेशन केंद्रे बंधनकारक करावी लागतील. मानसिक आरोग्याबाबत खुलेपणाने चर्चा होणे आवश्यक आहे. अपयश हे आयुष्याचा शेवट नसून नव्या संधीची सुरुवात असते, हा संदेश विद्यार्थ्यांच्या मनात रुजवणे गरजेचे आहे. पालकांनीही मुलांशी संवाद वाढवला पाहिजे. त्यांच्या भावनांना समजून घेतले पाहिजे. तुलना आणि दडपणाऐवजी विश्वास आणि आधार दिला पाहिजे. समाजानेही यशाची व्याख्या बदलण्याची गरज आहे. केवळ गुण आणि पगार यांनाच यशाचे मापदंड मानले जाणार असतील, तर विद्यार्थ्यांवरील मानसिक ताण कधीच कमी होणार नाही. विद्यार्थ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी शासन, शिक्षणसंस्था, पालक आणि समाज यांनी एकत्रितपणे संवेदनशील पावले उचलण्याची गरज आहे. अन्यथा देशाची सर्वांत मौल्यवान संपत्ती असलेली तरुण पिढी आपण गमावत राहू आणि त्याची किंमत संपूर्ण राष्ट्राला मोजावी लागेल.

# आधुनिक तंत्रज्ञानापुढे माणूस बनला गुलाम



माहिती क्रांती आणि तंत्रज्ञानाच्या विकासामुळे एक कृत्रिम जग निर्माण झाले आहे. एक असे जग जिथे काहीही वास्तविक नाही, सर्वकाही आभासी आहे. कृत्रिम समाज, कृत्रिम माणसं, कृत्रिम नाती, कृत्रिम भावना, कृत्रिम बुद्धिमत्ता, कृत्रिम सौंदर्य आणि इतकंच नव्हे तर कृत्रिम जीवन, कृत्रिम श्वास आणि अगदी कृत्रिम हसणंदेखील! सर्वकाही आभासी! याचा परिणाम असा होतोय की आभासी वस्तूंसोबत जगत असताना माणूस वास्तविक जीवनापासून दूर जात आहे. आभासी जगात सर्व काही क्षणिक, तात्पुरते आहे, सामाजिक आणि जवळचे नातेदेखील तात्पुरते आणि कृत्रिम होत चालले आहे. जोपर्यंत त्या गोष्टी उपयुक्त आहेत तोपर्यंत त्याचा किंवा त्याच्या संबंधांचा वापर करा, आणि जेव्हा त्यांची आवश्यकता नसते तेव्हा त्यांच्याशी नाते समाप्त करा. संबंध तोडून टाका. वास्तविक आज जीवन संगणकाच्या एका क्लिक सारखे सोपे झाले आहे. तुम्हाला हव्या असलेल्या गोष्टी एका क्लिकवर तुमच्यापर्यंत पोहोच- तात. असे म्हणता येईल की अत्याधुनिक तंत्रज्ञान म्हणजे संगणक, स्मार्टफोन इ. आधुनिक जगातील हे असे जिन्नस आहेत जे आपली इच्छा व्यक्त करताच आपल्या 'आका'ची आज्ञा पूर्ण करण्यास तत्पर असतात. फरक एवढाच आहे की पूर्वीचे जिन फक्त आजा- आजीच्या गोष्टींमध्येच असायचे, तर आजचे आधुनिक जीवन हे वास्तव जगाचा अविभाज्य भाग बनले आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील अभूतपूर्व प्रगतीमुळे तर्कशुद्धतेचे महत्त्व दिवसेंदिवस कमी होत असल्याचेही समाजशास्त्रज्ञ हॅबरमास यांनी म्हटले आहे.

आता माणसाची तर्कशुद्धता त्याला ध्येयाकडे जाण्यास प्रवृत्त करत नाही, तर केवळ संसाधने गोळा करण्यास मदत करते. याचाच परिणाम म्हणजे मानवाने निर्माण केलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाने माणसालाच आपला गुलाम बनवले आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आधुनिक माणूस स्वतःला पूर्वीपेक्षा अधिक मुक्त समजू लागला आहे, तर वास्तव हे आहे की तो पूर्वीपेक्षा अधिक परावलंबी होत चालला आहे. काही काळापूर्वीची एक घटना इथे नमूद करणे समर्पक ठरेल. आसाममधील एक नवविवाहित जोडपे त्यांच्या विवाह समारंभानंतर एका करारावर स्वाक्षरी करते.या करारात दोघांनीही काही अटी ठेवल्या आहेत जसे की महिन्यातून एकच पिझ्झा खाणे, घरच्या जेवणाला नेहमी हो म्हणणे, रोज साडी नेसणे, रात्री उशिरा पार्टी करायला पण फक्त एकमेकांसोबत जाणे, रोज जिमला जाणे, दर रविवारी सकाळी नवऱ्याने तयार केलेला नाश्ता खाणे. पंधरवड्याला खरेदी करायला जाणे इ.

नात्यात एवढा कृत्रिमपणा आणि अविश्वास आहे की लेखी तडजोड करण्याची गरज भासते हेच नवल! काही वर्षांपूर्वी अशाच प्रकारची घटना एका महानगरात घडली होती, ज्यामध्ये वधू-वरांनी लग्न समारंभात फेऱ्या मारत असताना अशा कराराची चर्चा केली होती, ज्यानुसार ते सहा महिने एकत्र राहतील आणि त्यांच्यात जमले नाही तर, ते कोणत्याही कायदेशीर कारवाईशिवाय पर- स्पर संमतीने वेगळे होतील. एक काळ असा होता जेव्हा विवाह म्हणजे संस्कार आणि पवित्र बंधन मानले जात होते, आज तीच विवाह नावाची संस्था आधुनिक समाजात मोडकळीस आली आहे. ही केवळ आभासी जगाची देणगी आहे. दोन-तीन वर्षांपूर्वी एका चिनी शास्त्रज्ञाने जीनोम-मॉडिफिकेशन तंत्रज्ञानाने जुळ्या मुली जन्माला घातल्याचा दावा करून वैद्यक आणि संशोधनाच्या जगात खळबळ उडवून दिली होती. या शास्त्रज्ञाने असा दावा केला आहे की असे डिझायनर बाळ संक्रमण आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारांपासून सुरक्षित असेल. बेबीक्लोन ही कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या (ख) क्षेत्रातील एक नवीन क्रांती आहे.

नैसर्गिक कृतींशी छेडछाड करून मानवी जीवनाला कोणत्या प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागू शकते किंवा जनुकीय सुधारित बाळांचा भावी पिढ्यांवर कसा परिणाम होऊ शकतो हे सांगणे कठीण आहे. त्यामुळे हा प्रश्न शेवटी विचार करायला भाग पाडतो की असे कोणते जग उदयास येत आहे जिथे लग्नासाठी पुतळा, लैंगिक इच्छांसाठी रोबोट आणि सिलिकॉन बेबी लोकांच्या पसंतीस उतरत आहेत. म्हणजेच, एक आभासी जग जिथे काहीही वास्तविक नाही. लग्न, पती-पत्नीच्या नात्यापासून ते मुलापर्यंत सर्व काही खोटे आहे. आणखी एक धक्कादायक उदाहरण म्हणजे आभासी जग. या वर्षाच्या सुरुवातीला तामिळनाडूतील तरुण- तरुणीच्या लग्नासाठी आभासी जग तयार करण्यात आले होते. यामध्ये वराच्या मृत वडिलांचे एक आभासी पात्र तयार करण्यात आले होते, जे वधू-वरांना आशीर्वाद देखील देऊ शकतात. यासोबतच वधू-वर, त्यांचे मित्र आणि नातेवाईक यांचे आभासी अवत- ारही तयार करण्यात आले.या लग्नाला उप- स्थित राहण्यासाठी खऱ्या जगातून आभासी जगात जावे लागेल. जिवंत असताना मृत समाजात (काल्पनिक जगात) सामील होण्याचे निवडणे म्हणजे भ्रमात जगणे किती हास्यास्पद आहे ? या तंत्रज्ञानाच्या जगात मृत्यूला नकार देणारे तंत्रज्ञानही उदयास आले आहे. वास्तविक नातेसंबंधांकडे दुर्लक्ष करून आभासी नातेसंबंधांच्या शोधात वास्तविक जीवन सोडण्यास माणूस उत्सुक आहे हे किती मोठे दुर्दैव आहे.

प्रश्न असा आहे की अशा परिस्थितीत विवाह, कुटुंब, नातेसंबंध आणि समाजाची व्याख्या काय असावी? समाजशास्त्रज्ञांना या व्याख्या पुन्हा कराव्या लागतील. आजचे आभासी जग खरेच समाज आणि कुटुंब संपवण्याची तयारी करत आहे का? लोक अनौपचारिक संस्थांना (कुटुंब, विवाह, नातेसंबंध) इतके कंटाळले आहेत का की त्यांचा या संस्थांवरील विश्वास उडाला आहे, किंवा या सामाजिक संस्था ज्या भूमिका पार पाडण्यासाठी तयार केल्या गेल्या आहेत त्या पूर्ण करण्यात अपयशी ठरत आहेत? समाजशास्त्राच्या संशोधकांनी या प्रश्नांवर संशोधन करण्याची गरज आहे, जेणेकरून त्यामागे दडलेले कारण-परिणाम संबंध शोधून त्या सोडवण्याचा प्रयत्न करता येईल. इथे एक मोठा प्रश्न उभा राहतो की जर कोणी अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर करून कोणतीही कमतरता भरून काढली, तर ती कृत्रिम हृदय, कृत्रिम डोळा, कृत्रिम हात- पाय इत्यादी काही प्रमाणात स्वीकारलेही जाऊ शकते. पण खरा समाज आणि खरी नाती असूनही व्यक्ती आभासी समाज आणि नातेसंबंधांकडे वाटचाल करत असेल, तर ते मानसिक दिवाळखोरीचे लक्षणच म्हणावे लागेल.

त्यामुळे मानवामध्ये नवीन प्रकारचे मानसिक आजार दिसून येत आ- हेत. सायबरस्पेसने ऑनलाइन व्यक्तिमत्त्व आणि ऑफलाइन व्यक्तिमत्त्वाच्या नवीन वर्गीकरणाला जन्म दिला आहे ज्यामुळे स्किझोफ्रेनियाच्या नवीन स्वरूपाचा जन्म होतो.येथे ऑनलाइन व्यक्तिमत्व वास्तविकतेपासून दूर असलेल्या व्यक्तीचा संदर्भ देते. तो अमर्यादित वेळ ऑनलाइन राहून आपला मौल्यवान वेळ घालवतो आणि सामाजिक जीवनापासून किंवा वास्तविक जीवनापासून अलिप्त होतो आणि तो आभासी जगात आपला सोबती आणि आनंद शोधू लागतो. प्रश्न असा आहे की आजच्या समाज आणि जीवनातील समस्यांपासून वाचण्यासाठी आभासी जग हा एक चांगला पर्याय असू शकतो का? उत्तर असेल, बहुधा नाही. मग खरा समाज राहण्यायोग्य बनवणे आणि त्यात निर्माण होणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्याचे मार्ग शोधणे आवश्यक आहे. समस्या किंवा आव्हानापासून दूर पळणे हा समस्येवरचा उपाय नसून सामूहिकपणे सोडवण्याचा प्रयत्न करणे हाच कायमस्वरूपी उपाय असू शकतो. या तंत्रज्ञानावर आधारित जगाचा भाग बनण्यापासून स्वतःला थांबवण्याची अजून वेळ आहे. माणसाने तंत्रज्ञानावर नियंत्रण ठेवले तर चांगलं असं म्हणतात, पण तंत्रज्ञान माणसावर नियंत्रण ठेवू लागलं की त्याच्या अस्तित्वालाच आव्हान मिळू लागतं. म्हणूनच व्हर्च्युअल नातेसंबंधांना वास्तविक जग आणि वास्तविक नातेसंबंधांनी बदलण्याची गरज आहे जेणेकरून हा समाज पुन्हा राहण्यायोग्य आणि जगण्यायोग्य होईल.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत, जि. सांगली

# जीवनाचे मर्म समाजकारणात!

आपण निरक्षर आहोत म्हणून आपली कोणतीही कामं अडायला नको. या विषयी गाडगेबाबा अतिशय सतर्क असायचे. सतत भ्रमंती करताना सोबत एखादा सचिव असावा किंवा लेखनिक असावा याची गरज त्यांना कधी भासली नाही. तरीसुद्धा त्यांचे कुठेही कोणतीही कामे अडली नाहीत. काम करण्याची आंतरिक ईच्छा असल्यावर मार्ग सापडतात. याचा प्रत्यय बाबांच्या जीवनशैलीकडे पाहिले की आपल्याही लक्षात येईल. एक पिश्वी, एक वही, त्यात कच्चा मसुदा, त्यातील सर्व प्रकारचा लेखी दस्तऐवज हे बाबांचे भावी नियोजन. संपर्कात आलेल्या कोणत्या माणसाचे अक्षर छान आहे? हे बाबा हेरायचे. त्यात सहवासात आलेली कायमस्वरुपी स्मरणात ठेवावी अशी माणसे, दात्यांची नावे, देणगीचा तपशील, जबाबदारी घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागणारे सर्व प्रकारचे साहित्य, नव्या वास्तूची निर्मिती, दिवसभराचे नियोजन, कोणत्या कोणत्या दिवशी प्रबोधन करायचे आहे याच्या संपूर्ण नोंदी घेणे. यातून त्यांची काम करण्याची तीव्र ईच्छाशक्ती दिसून येते. परिस्थितीला दोष द्यायचा नाही. प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढायचा. सुंदर अक्षराचा जो धनी आहे. त्याचा उपयोग अवश्य करायचा. अक्षरात दोष दिसत असल्यास योग्य मार्गदर्शन करायला विसरायचे नाही. नोंदी सुंदर आणि बिनचूक घेतल्यास त्याला शाबासकी द्यायला विसरायचे नाही. अभ्यास, रियाज, साधना या शब्दामागचा भावार्थ ते नेहमी आपल्या खूप साध्या सोप्या शब्दात सांगायचे, शब्द जरी साधे असले तरी ते सांगितले कुणी? याला खूप महत्व असते. ते गाडगेबाबां सारख्या सिद्धहस्त व्यक्तीच्या अंतःकरणातून बाहेर पडले आहेत. त्यामुळे ज्याला साधना करण्याची प्रामाणिक ईच्छा आहे, त्याच्या अंतःकरणात ते घर करायचे. बाबा बोलले, चला लगेच कामाला लागले पाहिजे. ते शब्द कृतीत उतरविण्यासाठी संपर्कातील व्यक्ती अस्वस्थ होत होता. तो विचार मेंदूत शिरुन त्याचे इंद्रीय कार्यरत होत होते. उसळत्या रक्ताची उगवती पिढी तर बाबाचा शब्द प्रमाण मानून कामाला लागायची.

अभ्यासासाठी, वळणदार अक्षरासाठी, शरीरधन कमावण्यासाठी. त्यांनी समाजकार्याचा संदेश दिला असेल तर समाजसेवेसाठी तत्पर. नियोजित वेळेत काम झाले म्हणजे नियोजन बिघडणार नाही. त्यासाठी प्रत्येकाने ठरवून दिलेल्या वेळेतच काम केले पाहिजे. ते वेळेपूर्वी झाले तर चालेले पण नियोजित वेळेनंतर, शक्य नाही. कदापी शक्य नाही. शिवाय कामाची गुणवत्ता महत्वाची होतीच. काम वेळेत करुन गुणवत्तेकडे दुर्लक्ष करणारे महाभाग त्यांच्या नजरेतून सुटणे अशक्य. अक्षरओळख नसणारे बाबा एवढे व्यवस्थापन दक्ष कसे ? त्यांना ही अफाट बुद्धीमत्ता आणि अलौकीक कार्यक्षमता कशी प्राप्त झाली असावी? हा प्रश्न अनेकांना पडत होता. कामाप्रती असणारी निष्ठा त्यांच्यासाठी जीव की प्राण. विशिष्ट कामावर माझे जेवढे प्रेम,त्या कामावर तेवढेच प्रेम करणारी माणसे जोडण्यात त्यांना स्वारस्य. कुणी माझा नातेवाईक ,सगासोयरा,माझ्या कुटुंबातला आहे. म्हणून खोट्या प्रतिष्ठीचे प्रदर्शन करणाऱ्या टिकोजीरावाची मिजास खपवून घेण्याचं काहिच कारण नाही. त्या हरामखोराले त्याची जागा दाखवा. त्याचे फाजील लाड नको. बखोटीले धरुन बाहेर काढा.बोहाऱ्याले. असा स्पष्ट आदेश गाडगेबाबा मिशनच्या सर्व संस्थापक सदस्यांना दिला होता. कोणतेही समाजकार्य करतांना त्या ठिकाणी आप्तेष्ठांचा शिरकाव एकदा का झाला की या आयत्या बिळावरच्या नागोबाची वाढणारी आरेरावी, ज्याच्या नावे संस्था चालते त्या व्यक्तीची प्रतिष्ठा धुळीस मिळवून मगच थांबते.जे दाते संस्थेच्या मागे भक्कमपणे उभे आहेत. त्यांची विश्वासार्हता गमावली की संस्थेचे भविष्य अंधकारमय होण्यास वेळ लागत नाही. पुण्यातील धर्मशाळेत आल्यावर त्याचा परतीचा प्रवास पूर्ण झाला. योगायोग असा परत आल्यावरही त्याला प्रथम गाडगेबाबाच्या हाती जावे वाटले. बाबांनी ते पत्र एका सहकाऱ्याकडून वाचून घेतले.काही क्षण त्यांच्या डोळ्यासमोरचा प्रकाश नाहीसा झाला. आपला एक अनुयायी असा विचार कसा काय करु शकतो? हा प्रश्न त्यांना पडला. आपले काही चुकत असेलं तर आपण स्वतःला तपासले पाहिजे.दुरुस्त केले पाहिजे. अशा विचारांचे वादळ त्यांच्या मनात निर्माण झाले. काही दिवस त्यावर त्यांनी काहीच वाच्यता केली नाही. काही कालावधी जाऊ दिला. त्यानंतर तो अनुयायी उपस्थित असतांना त्या पत्राचं वाचन झालं. बाबाचे सर्व निष्ठावंत सहकारी त्या सहकाऱ्याकडे अतिशय त्वेषाने पाहू लागले. तो कुणाच्याही नजरेला नजर देत नव्हता.खाली मान घालून अश्रू ढाळण्याशिवाय दुसरा पर्याय त्याच्याकडे होता कुठे?

धरमशाळा सगळ काम कऱ्याले् काही शिस्त लागलं का नाही? म्या जर ठरवलं कोणाले शब्दानं दुखवायचं नाही. त सर्वे ( सर्व ) लोकं कामं निट करतीलं याची काही खात्री हाये का? सर्वेजण मनमानी करु लागले तं हे जनता जनार्धनासाठी उभं केलं, ते ठिकाणावर राहिलं का? बरं म्या कडक वागणं देतो सोडून. मले तुम्ही सांगा, म्या कसा वागू? गाडगेबाबांनी त्या पत्राचे उत्तर देतादेता त्या सहकाऱ्या समोरच प्रश्न निर्माण केला. त्यामुळे तो एवढा काही निरुत्तर झाला. त्याच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. वाहत्या अश्रूधाराच बाबाच्या प्रश्नाचे उत्तर देत होत्या. पश्चातापदग्ध अवस्थेत त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडत नव्हते. तो कसेबसे बोलू लागला. बाबानं जनता जनार्धनासाठी एवढं केलं, पण मले त्याह्याच्यातला देव दिसला नाही. कुठून म ह्या डोस्क्यात अशी अवदसा शिरली बाप्पा. माहा लय चुकलं ! मले सर्वेजण खेटरानं मारा,पण मले दुर ढकलू नका.पुन्हा असा इचकपणा नाही करणारं म्या. मले एक डाव माफी द्या.

बाबांनी त्याला लेकरासारखं जवळ घेतलं. लेकराच्या अंगावरुन मायेनं हात फिरवावा तसा आपला खडबडीत हात त्याच्या अंगावरुन फिरवला.बाबाचा खराटा आपल्या सर्वांगावरुन फिरल्याचा भास त्याला झाला. त्यामुळे त्याचे शरीर, मन, विचार कायमस्वरूपी स्वच्छ झाले. आपण वाऱ्याच्या दिशेने धावतं गेलो आन् वावटळीत सापडलो. आपले कान भरुन देणारा नामानिराळा राहिला. आपल्यासाठी देव असणाऱ्या बाबावर बेछूट आरोप केले.भावनेच्या भरात खरं काय,खोटं काय ? याचा विचार केला नाही. पापाचे धनी आपणच झालो. बाबा किती लोकाच्या सुखदुःखात सहभागी झाले. आपल्यावर लेकरासारख प्रेम केलं. आपल्या मनात काऊन असा इचार आला अशिलं. त्याच्या डोक्यात या विचारानं थैमान घातलं. परत असे आरोप करण्याचा मोह त्याला झाला नाही. त्याबरोबर तशा विचाराच्या लोकांना आपोआप धडा मिळाला.

राजकारणी लोकांशी खूप निकटचे संबध असूनही राजकारणापासून बाबा नेहमीच दूर राहिले. 'आपल्या जीवनाचे मर्म समाजकार्यात आहे.' हा विचार जगणे त्यांना शक्य झाले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी सहभागी व्हावं यासाठी संपर्कातील अनेक दिग्गज आग्रह धरु लागले. प्रबोधनकार ठाकरेंना बाबाचे प्रबोधन जास्त महत्वाचे वाटत होते. तर महाराष्ट्राचे विनोदी वक्ते, लेखक, झंझावती पत्रकार आचार्य अत्रे यांनाही उपस्थित जनसमुदायाला बाबा आपल्या वाणीने जास्त न्याय देऊ शकतील याविषयी खात्री होती. सेनापती बापट तर स्वातंत्र्य सेनानी, क्रांतिकारी विचार ज्यांच्या रोमरोमात संचार करत होते. तरी सुद्धा संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठी बाबाक्रांती अधिक प्रभावी ठरु शकेलं.या विषयी त्यांच्या मनात संदेह नव्हता. चोहीकडून असा आग्रह होत असतांना, 'आपण दुराग्रही आहोत.' असा समज न होऊ देता आपला मनोनिग्रह अढळ ठेऊन, राजकारणापेक्षा समाजकारणाचा पिंड आपल्यासाठी कसा महत्वाचा, हे दृढनिश्चयाने त्यांनी सिद्ध केले.

स्त्री स्वातंत्र्याचे महत्व जनसामान्यात रुजवण्यासाठी, प्रस्थापित व्यवस्थेचा रोष पत्करुन, मनुस्मृतीचे दहन करणारे बाबासाहेब आंबेडकर,तिथेच थांबत नाहीतं. स्त्री सशक्तीकरणाला घटनात्मक बळ देतात. गाडगेबाबा आपल्या प्रबोधनात्मक किर्तनातून, सगळ्या मायमावल्याले जर शिक्षण मिळालं तं त्याचा सर्व्या (सर्व) कुटुंबावर परिणाम किती चांगला होईल? मायमावल्याच्या शिक्षणाले काही महत्व नाही. असं समजणारे बापे किती चुकीचा इचार करतात. हे सर्व समाज मनावर अतिशय सोप्या भाषेत त्यांनी बिंबवलं. बालविवाहाचे दुष्परिणाम समाजाला पटवून देतांना सावित्रीमाई आणि ज्योतीरावांच्या कार्याची महती पटवून देणे. नवस करणाऱ्या,बुवाबाजीला महत्व देणाऱ्या मायमावल्या भोंदू बाबाची कशी शिकार होतात? याचे सौदाहरणासह सविस्तर विवेचन देऊन परिवर्तन स्विकरण्यासाठी सामान्य माणसाला सिद्ध करण्याचे अवघड काम सोपे करावे ते फक्त गाडगेबाबांनीच. महिला सशक्तीकरणासाठी त्यांनी किर्तनातून केलेले प्रबोधन खूप प्रभावी ठरायचे. त्यांची सरळ, साधी, सोपी भाषा थेट काळजाला जाऊन भिडायची. त्यामुळे विचारचक्र सुरु व्हायचे. अनेक नामांकीत विद्वान, सामान्य माणसाला, त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी बाबांचे प्रबोधन सार्थ ठरायचे.

**-प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# दहशतवाद वैश्विक समस्या

भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची २१ मे १९९१ मध्ये तामिळनाडू मधील श्रीपेराम्बदूर येथे एलटीटीई (लिट्टे) च्या दहशतवाद्यांनी एका प्रचारसभेत बॉम्बस्फोट करून हत्या केली. राजीव गांधी यांच्या हत्येने संपूर्ण देश हादरुन गेला. १९८४ साली माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची खलिस्तानवादी दहशतवाद्यांनी गोळ्या घालून हत्या केली त्यानंतर भारताला बसलेला हा दुसरा हादरा होता. हा हल्ला भारताच्या सार्वभौमत्वावर होता. या हल्ल्याने भारतच नव्हे तर संपूर्ण विश्वच दहशतवाद्यांच्या दहशतीखाली आले.

२१ मे १९९१ पासून सुरू झालेला दहशतवाद्यांचा हा धुमाकूळ आजही जगभरात सुरू आहे म्हणूनच २१ मे हा राजीव गांधी यांचा स्मृतिदिन संपूर्ण जगात दहशतवादी विरोधी दिन म्हणून पाळण्यात येतो. सद्य स्थितीत जगभरात वेगवेगळ्या प्रकारचा दहशतवाद पसरला आहे. दहशतवादाने संपूर्ण जग व्यापले आहे. जगातील एकही देश आज दहशतवादापासून मुक्त नाही. दहशतवाद आज सर्व देशांचे दार ठोठावीत आहे. अमेरिकेसारख्या जागतिक महासत्तेला देखील दहशतवादाचा तडाखा बसला आहे. दहशतवादी हा शब्द उच्चारायला जरी वेगळा वाटत असला तरी याचे नेतृत्व करणारे लोक हे अशिक्षित नसून उच्चशिक्षित असतात. देव व धर्माच्या नावा- खाली तरुणांचे ब्रेन वाशिंग करुन हे लोक श्रध्येच्या नावाखाली जगभरात दहशतवाद पसरवीत आहेत. दहशतवाद म्हणजे लोकशाहीच्या विरोधा- तील बाजू त्यामुळे दहशतवाद हा लोकशाही शासनव्यसवस्थेत अडथळे निर्माण करतो.



सामाजिक असंतुलन हे दहशतवादाचे मूळ आहे. सत्तेची हाव, अधिकार नाकारणे, स्वतःच्या फायद्यासाठी दुसऱ्याला ओलीस धरणे, धर्मसत्ता लादणे, जाती भिन्नता, धर्मभेद तसेच समाजातील भिन्न संस्कृतीचे लोक एकमेकांबरोबर आणि एकाच राजकीय छत्राखाली व एकाच न्यायव्यवस्थेखाली राहायला नाखूष असतात. बरेचदा राज्यकर्त्यांचे एखाद्या भागाकडे दुर्लक्ष होते व त्या भागाची प्रगती खुंटते त्यामुळे एकाच देशात आर्थिक भेदभाव निर्माण हातात आणि त्यातून आतंकवादाचा जन्म होतो. आपण सर्वांनी जागरूक होणे आवश्यक आहे. दहशतवाद हा मानवजातीचा शत्रू आहे. यामुळे संभाव्य धोक्याची जाणीव ठेवून प्रतिकारासाठी सज्ज असले पाहिजे. जागतिक दहशतवादाचा सगळ्यात मोठा हादरा भारताला बसला आहे, त्यामुळे दहशतवाद नष्ट करणे ही देशातील प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे. दहशतवादाची सर्वाधिक झळ भारताला बसली आहे. दहशतवादाने भारताला दोन कर्तव्यदक्ष पंतप्रधानांना गमवावे लागले आहे. अगदी सर्वसामान्य नागरिकांपासून पंतप्रधानांपर्यंत सर्वांनाच दहशतवाद्यांनी लक्ष केले आहे.

गेल्या पन्नास वर्षापासून भारत दहशतवादाचा झळा सोसतोय त्यात देशातील लाखो निष्पाप नागरिकांचा बळी गेला आहे आजही जात आहे. मागील वर्षी २२ एप्रिल रोजी काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी २६ निष्पाप नागरिकांना ठार केले त्यामुळे भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात संतापाची लाट उसळली होती. भार- ताने ऑपरेशन सिन्दुर राबवून त्याचा बदला घेतला मात्र तरीही दहशतवादी त्यातून धडा घेतील असे वाटत नाही. ते दहशतवाद पसरवतच राहतील. दहशतवाद संपवण्याची जबाबदारी केवळ सरकारची, सुरक्षा यंत्रणेची किंवा लष्कराची नाही तर देशा- तील प्रत्येक नागरिकांची आहे. देशातील नागरिकांनीही नेहमी सजग राहून दहशतवादाचा मुकाबला करायला हवा. आपल्या आसपास कोठेही काही संशयास्पद आढळले तर नागरिकांची त्यांची माहिती सुरक्षा यंत्रणांना द्यावी. सुरक्षा यंत्रणेइतकेच नागरिकांनीही सजग राहून दहशतवादाचा मुकाबला करायला हवा.

दहशतवादाची झळ जशी भारताला बसली आहे तशीच ती जगालाही बसली आहे. दहशतवादाने केवळ भारतच नव्हे तर संपूर्ण जग पोळले आहे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, जर्मनी, जपान, दक्षिण कोरिया, रशिया, इस्त्राईल, ऑस्ट्रेलिया, श्रीलंका या जगातील बलाढ्य देशांनाही दहशतवाद्यांनी तडाखा दिला आहे. केवळ बलाढ्य देशच नव्हे तर जगातील सर्वच लहान मोठ्या देशांना दहशत- वादाची झळ बसत आहे म्हणूनच दहशत-वादाचा मुकाबला करणे ही कोणा एका देशाची नाही तर जगातील सर्व देशांची जबाबदारी आहे. दहशतव- ादाची समस्या ही वैश्विक आहे म्हणून दहशतव- ादाशी लढायचे असेल तर संपूर्ण जगाला एक व्हावेच लागेल त्यासाठी अमेरिका, रशिया सारख्या महासत्ता असलेल्या देशांनी दुटप्पी भूमिका न घेता दहशतवादा विरुद्ध युद्ध पुकारावे. दहशतवादी हे मानवतेचे शत्रू आहे. त्यामुळे संपूर्ण जगानेच एक होऊन या मानवतेच्या शत्रूंचा मुकाबला करायला हवा.

**-श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्या -जिल्हाधिकारी कर्डिले

## विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने विभाग प्रमुखांसमवेत बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)** –भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकार मतदारसंघाच्या द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, त्यानुसार जिल्ह्यात १८ मे पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या आचारसंहितेचा भंग होणार नाही याची सर्व विभाग प्रमुखांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात गुरुवारी सर्व विभाग प्रमुखांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, उपजिल्हाधिकारी (सामान्य) अजय शिंदे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) राजकुमार माने यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

विधानपरिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकार मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी जिल्ह्यातील एकूण ८ मतदान केंद्रांवर १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होणार असून, मतमोजणी २२ जून २०२६ रोजी करण्यात येणार आहे. या निवडणुकीसाठी जिल्ह्यात १८ मे पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

दुष्काळ, पाणीटंचाई, नैसर्गिक आपत्ती यासारखी परिस्थिती वगळता आचारसंहिता कालावधीत विविध योजनांच्या शासकीय व नवीन जाहिराती देता येणार नाहीत. तसेच नवीन मान्यता, शासकीय कामांचे उद्घाटने करता येणार नाहीत. ग्रामसभेसह कोणत्याही कार्यालयात शासकीय अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत राजकीय बैठका घेण्यासही मनाई आहे. मतदारांवर प्रभाव पडेल असे कोणतेही काम या कालावधीत करू नये, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. याशिवाय शासकीय कार्यालयांमध्ये कोणत्याही योजना किंवा राजकीय व्यक्तींची छायाचित्रे ठेवू नयेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही यासाठी सर्वांनी दक्षता घ्यावी. या आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन त्यांनी सर्व संबंधितांना केले.

निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची माहिती उपजिल्हाधिकारी राजकुमार माने यांनी यावेळी दिली. मुक्त व निर्भय वातावरणात निवडणूक पार पडावी, तसेच मतदारांवर कोणताही प्रभाव पडणार नाही यासाठी आवश्यक खबरदारी घेण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. उपजिल्हाधिकारी अजय शिंदे यांनी प्रास्ताविकात निवडणूक कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका न झाल्यामुळे त्यांचे सदस्य मतदार राहणार नसल्याची माहितीही त्यांनी दिली.

या बैठकीपूर्वी निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय पक्षाच्या प्रतिनिधीसोबत बैठक संपन्न झाली. या बैठकीत मतदान प्रक्रिया, प्रचारासंदर्भातील नियम, परवानग्या तसेच निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

# पाणी फॉउंडेशन फार्मर कप २०२६ जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** –पाणी फाउंडेशन अंतर्गत आयोजित सत्यमेव जयते फार्मर्स कप स्पर्धा २०२६ जिल्हास्तरीय कार्यशाळा व मार्गदर्शन सत्र जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.



नांदेड जिल्ह्यात सुरू असलेल्या या उपक्रमाच्या कामकाजाबाबत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी समाधान व्यक्त केले. सर्व विभागांनी समन्वयाने व जबाबदारीने कार्य करण्याचे निर्देश त्यांनी दिले. प्रत्येक गावामध्ये लोकसहभाग वाढवून हा उपक्रम जनआंदोलनाच्या स्वरूपात राबविण्याचे आवाहन केले. तसेच प्रशासन, कृषी विभाग, स्वयंसेवी संस्था व ग्रामस्तरावर नागरिकांनी एकत्रितपणे काम केल्यास नांदेड जिल्हा राज्यामध्ये आदर्श निर्माण करू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या कार्यशाळेस पाणी फाउंडेशनचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. अविनाश पोळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या बैठकीस उपविभागीय कृषी अधिकारी नांदेड/देगलूर/किनवट, सर्व तालुका कृषी अधिकारी, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (BTM/TM), फार्मर्स कप स्पर्धे साठी नियुक्त कृषी मेंटर्स, कृषी विभागाचे उपक्रम अधिकारी, सर्व समन्वयक, समूह सहायक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे प्रतिनिधी, तालुका अभियान व्यवस्थापक, अभियान कक्ष अधिकारी, HIMWP-MH GVSS कंधार, लोहा तसेच किनवट येथील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या मार्गदर्शन सत्रामध्ये सत्यमेव जयते फार्मर्स कप स्पर्धा २०२६ ही केवळ स्पर्धा नसून गाव विकास, जलसंधारण, नैसर्गिक शेती आणि सामूहिक परिवर्तनाची प्रभावी चळवळ असल्याचे अधोरेखित करण्यात आले. गाव पातळीवर शेतकऱ्यांना एकत्र आणून गट बांधणी कशी करावी. गावातील प्रत्येक घटकाचा सहभाग कसा वाढवावा. तसेच स्पर्धेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी स्थानिक नेतृत्व व समन्वयाचे महत्व काय आहे याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

डॉ. अविनाश पोळ यांनी आपल्या प्रभावी व प्रेरणादायी मार्गदर्शनातून शेतकऱ्यांमध्ये विश्वास निर्माण करून त्यांना सामूहिक उद्दिष्टासाठी एकत्र आणणे हीच खरी यशाची गुरुकिल्ली असल्याचे सांगितले. त्यांनी नैसर्गिक शेती, गट शेती, पाणी व्यवस्थापन, मृदसंवर्धन आणि लोकसहभाग या घटकांचा परस्पर संबंध स्पष्ट करत अनेक यशस्वी उदाहरणांद्वारे उपस्थितांना प्रेरित केले. शाश्वत शेती व्यवस्थेकडे वाटचाल करताना उत्पादन खर्च कमी करून पर्यावरणपुरक शेती पद्धती स्वीकारणे काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी शेतकरी केंद्रित नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि वेळोवेळी आढावा घेण्याचे महत्व स्पष्ट केले.

## अर्धापूर नगरपंचायतच्या स्वीकृत सदस्याची आज निवड

**अर्धापूर (प्रतिनिधी)**– नगरपंचायतीच्या स्वीकृत सदस्यांची निवड करण्यासाठी विशेष बैठक दि.२२ शुक्रवारी नगरपंचायत सभागृहात बोलविण्यात आली आहे.

अर्धापूर नगरपंचायतीच्या स्वीकृत सदस्य निवडीसाठी निवडणूक पिठासीन अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी डॉ.सचिन खल्लाळ, मुख्याधिकारी जगदीश दळवी यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. नगरपंचायत निवडणूक होऊन साडे चार वर्षे झाले असून नगरपंचायतीमध्ये शहर विकास आघाडीचे १३, एमआयएमचे तीन, राष्ट्रवादी एक असे पक्षीय बलाबल असल्याने सत्ताधारी शहरी विकास आघाडीचे दोन स्वीकृत सदस्य निवडले जाणार आहेत. स्वीकृत सदस्य निवडीचे सर्वाधिकार माजी मुख्यमंत्री,खा. अशोकराव चव्हाण व आ.श्रीजय चव्हाण यांच्याकडे असल्याने ते कोणत्या नावाला संमती देतील याकडे अर्धापूर शहरातील

# घनकचरा व्यवस्थापन नियमाचे उल्लंघन झाल्यास दंडात्मक, फौजदारी कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ व मा. सर्वोच्च न्यायाल-याच्या निर्देशाचे पालन करून आपला परिसर स्वच्छ ठेवावा. या नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक किंवा फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिला आहे.

भारत सरकार पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयामार्फत घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ निश्चित करून दिले असून, त्याची अंमलबजावणी १ एप्रिल २०२६ पासून सुरु झाली आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ५ मे २०२६ रोजीच्या आदेशानुसार नांदेड जिल्ह्यात १४ मे २०२६ रोजी विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ नुसार प्रत्येक नागरिकांनी त्यांच्या घरातील घनकचरा हा ओला कचरा, सुका कचरा, सॅनिटरी कचरा व विशेष देखभाल/घरगुती घातक कचरा या ४ पद्धतीने वर्गीकृत करून घंटागाडीत देणे बंधनकारक आहे. नागरिकांनी उघड्यावरील कचरा जाळू नये. सार्वजनिक ठिकाणी, नालीमध्ये कचरा फेकू नये, सॅनिटरी पॅड, डायपर व्यवस्थितपणे गुंडाळून घंटागाडी स्वच्छता कर्मचाऱ्यास देणे, कोणत्याही परिस्थितीत वैद्यकीय, घातक कचरा घरगुती कचऱ्यात मिसळू नये. रस्त्यावरील विक्रेत्यांनी, व्यापाऱ्यांनी त्यांचेकडील शिल्लक, उष्टे अन्न, डिस्पोजेबल प्लेट, ग्लास, कप, कॅन, नारळाचे कवच, पॅकेजिंग, पाउच इत्यादी कचरा थेट रस्त्यावर न फेकता वर्गीकरणानुसार साठविण्यासाठी वेगवेगळे डब्बे, कंटेनर ठेवावीत.

घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ मधील नियम ६ अन्वये Bulk Waste Generator म्हणजे रहिवासी सोसायटी, अपार्टमेंट, गृहनिर्माण संस्था, सरकारी कार्यालय, विभाग, शैक्षणिक संस्था, रेल्वे-बस स्टेशन, मॉल्स, हॉटेल, हॉस्पीटल, मार्केट, मंगल कार्यालये, स्टेडियम ई. ज्यांचे क्षेत्र २० हजार स्क्वेअर मीटर आहे, जे दररोज ४० हजार लिटर पाणी वापरतात, जे दररोज १०० किलो किंवा त्यापेक्षा जास्त कचरा निर्माण करतात अशा सर्व BWG यांनी कचऱ्याचे वर्गीकरण करून ओला कचऱ्यावर जागेवर प्रक्रिया करावी व सॅनिटरी, सुका कचरा नगरपरिषद, मनपा किंवा अधिकृत एजन्सीकडे सुपूर्द करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नांदेडमध्ये प्राचीन 'गंगा दशहरा' उत्सवाचे आयोजन

## २३ ते २५ मे दरम्यान श्रीराम मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)** –भारतीय सनातन संस्कृतीतील अत्यंत पवित्र आणि अध्यात्मिक महत्त्व असलेल्या प्राचीन 'गंगा दशहरा' उत्सवाचे यंदा नांदेड येथे पुनरुज्जीवन होत आहे. अधिक ज्येष्ठ मासानिमित्त दि. २३ ते २५ मे २०२६ या कालावधीत होळी येथील प्राचीन श्रीराम मंदिर व श्रीगंगा मंदिर परिसरात विविध धार्मिक, आध्यात्मिक व भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प. पू. श्री शुकानंदनाथ संस्थान, वसमत यांच्या नांदेडस्थित शिष्यपरिवारातर्फे हा उत्सव साजरा करण्यात येत आहे.

उत्सवादरम्यान दररोज सकाळी ६ ते ९ या वेळेत काकडा आरती व श्रीगंगा अभिषेक, सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत प.पू. श्री शुकानंद महाराज पोथी पारायण, तसेच सायंकाळी ५ ते ७ या वेळेत पंचपदी व श्रीगंगा (गोदावरी) आरतीचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीगंगा आरती संत श्रीदासगणू महाराज घाट, होळी येथे होणार आहे.

दि. २३ मे रोजी सायंकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत डॉ. सौ. जान्हवी माळाकोळीकर यांचे पू. श्री जगन्नाथ पंडित विरचित 'श्री गंगालहरी' या विषयावर प्रवचन होणार आहे. दि. २४ मे रोजी प्रा. डॉ. उदय कुमठेकर यांचे 'श्रीविद्या व श्रीयंत्र' या विषयावर विशेष विवेचन आयोजित करण्यात आले आहे. दि. २५ मे रोजी दुपारी १२.३० वाजता काल्याचे कीर्तन ह.भ.प. सौ. वैष्णवी महाराज यांचे होणार असून, सायंकाळी श्रीगंगा आरतीनंतर उत्सवाची सांगता होईल.

ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदा ते ज्येष्ठ शुद्ध दशमी या कालखंडात साजरा होणारा गंगा दशहरा उत्सव भारतीय अध्यात्म परंपरेतील महत्त्वपूर्ण पर्व मानले जाते. पुराणानुसार राजा भगीरथ यांच्या तपश्चर्येमुळे गंगामातेचे पृथ्वीवर अवतरण झाले. गंगामातेच्या पूजन, स्मरण व आराधनेमुळे पापक्षालन होऊन पुण्यप्राप्ती होते, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

प. पू. श्री शुकानंदनाथ संस्थान हे श्रीविद्या उपासनेचे प्राचीन व जागृत शक्तीपीठ मानले जाते. इ.स. १८०० पासून येथे अखंड श्रीविद्या साधना व गुरुपरंपरा सुरू असून महाराष्ट्र, तेलंगणा व कर्नाटक राज्यांमध्ये या परंपरेचा मोठा शिष्यसंप्रदाय आहे.

सर्व कार्यक्रम श्रीराम मंदिर, होळी येथे आयोजित करण्यात आले असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पुण्यलाभ घ्यावा, असे आवाहन सरदेशपांडे परिवार व समस्त भक्तमंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुदखेडमध्ये नीट परीक्षा पेपर फुटीविरोधात कॉंग्रेस आक्रमक; सखोल चौकशीची मागणी



**मुदखेड (प्रतिनिधी)**– वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाची समजली जाणारी नीट परीक्षा पेपर फुटी प्रकरण उघड झाले असून, यामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारमय झाले आहे. या विरोधात कॉंग्रेसने आक्रमक भूमिका घेत या गैरप्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे तहसीलदार यांच्याकडे करण्यात आली आहे.

'नीट'चा पेपर फुटला असल्याने या प्रकरणाचे थेट कनेक्शन लातूर, नांदेडपर्यंत पोहोचले आहे. यामुळे प्रामाणिकपणे मेहनतीने अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ खेळला जात असल्याने या गंभीर प्रकारामुळे परीक्षेच्या पारदर्शक व विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नीट पेपर फुटीच्या निषेधार्थ शहर व तालुका कॉंग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करीत या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासंदर्भात बुधवार, दि.२० मे रोजी लेखी निवेदन तहसीलदार आनंद देऊळगावकर यांना देण्यात आले आहे.

आर्थिक फायद्यासाठी गुणवत्ताधारक होतकरू विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात ढकलणाऱ्या खाजगी कोचिंग क्लासेस तसेच संबंधित दोषींच्या विरोधात कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

कॉंग्रेस पक्षाच्यावतीने शासनाकडे नीट पेपर फुटी प्रकरणाची उच्चस्तरीय व निपक्ष चौकशी करण्यात यावी. मुख्य सूत्रधार व संबंधित सर्व आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी. विद्यार्थ्यांचा विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी परीक्षा प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक करण्यात यावी. भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी सक्षम सुरक्षा व्यवस्था व आधुनिक तांत्रिक यंत्रणा उभारण्यात यावी. यासोबतच विद्यार्थ्यांच्या मानसिक तणावाचा विचार करून केंद्र शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा, या प्रमुख मागण्यांचा निवेदनाद्वारे पाठपुरावा करण्यात आला आहे.

या निवेदनावर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे सहसचिव गिरीश कोतावार, युवा कॉंग्रेसचे शहराध्यक्ष मुजीब पठाण, गंगाधर डांगे, विश्वनाथ पवार निवघेकर, रमेश बोडके, वेदांत शेवटे, राकेश बोडके, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष माणिका मुंगल, सुरेश ढगे, विठ्ठल आचारी यांच्यासह कॉंग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

## भाजप सोशल मीडिया तालुकाध्यक्षपदी गुरुराज रणखांब

**अर्धापूर (प्रतिनिधी)**– तालुक्यातील भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते गुरूराज रणखांब यांची भाजप सोशल मीडियाच्या तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली. माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, आ. श्रीजयाताई चव्हाण यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन गौरविण्यात आले.



माजी मुख्यमंत्री, खा. अशोकराव चव्हाण व आ. श्रीजयाताई चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, भाजप तालुका प्रभारी माजी सभापती किशोर स्वामी, कृऊबाचे सभापती संजय देशमुख लहानकर, भाजप तालुकाध्यक्ष बालाजी गव्हाणे यांनी भाजप सोशल मीडिया तालुकाध्यक्षपदी गुरुराज रणखांब यांची निवड केली आहे. त्यांच्या निवडीबद्दल अनेकांनी अभिनंदन केले.

# एचएसआरपी नंबर प्लेट वेळेत बसवा आणि दंड टाळा

## नंबर प्लेट बसवण्यास ३० जूनपर्यंत मुदत

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्ह्यात १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या ज्या वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट नाही अशा सर्व वाहनचालकांनी अधिकृत https://mhhsrp.com या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरून ३० जून २०२६ पर्यंत एचएसआरपी नंबर प्लेट बसवून घ्यावी, असे आवाहन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत कंकरेज यांनी केले आहे.

एचएसआरपी नंबर प्लेट नसलेल्या वाहनाचे काम जसे वाहन हस्तांतरण, वाहनाची पुन: नोंदणी, वाहनाचे वित्तदात्यांची नोंदणी, वाहनाची वित्तदात्याचा बोजा उतरवणे इत्यादी वाहना संबंधी कामकाज होणार नाही. तसे न केल्यास मोटार वाहन कायद्यानुसार HSRP नंबर प्लेट विहित वेळेत न बसविल्यास परिवहन विभागामार्फत दंड आकारणी करण्यात येईल. दंड टाळण्यासाठी विहित मुदतीत HSRP नंबर प्लेट बसवून घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५० नुसार वाहनाला क्ष्ठझ बसविण्याची तरतूद आहे. रस्ते व महामार्ग मंत्रालय नवी दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशानुसार १ एप्रिल २०१९ पासून उत्पादित होणाऱ्या सर्व नवीन वाहनांना हायसिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्याची तरतूद करण्यात आली आहे.

वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करुन होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी व नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादीत वाहनांना क्ष्ठझ बसविण्याकरिता मे. रोजमर्टा सेफ्टी सिस्टम लिमीटेड या संस्थेची उत्पादकाची निवड करण्यात आली आहे.

# वंचित शेतकऱ्यांना तत्काळ पीक विमा द्या; कृषी मंत्री दत्ता भरणे यांच्याकडे मागणी

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)**– नांदेड जिल्ह्यासाठी मंजूर झालेल्या तब्बल ८०० कोटी रुपयांच्या पीकविमा योजनेत अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात विम्याची रक्कम जमा झाली असली, तरी जिल्ह्यातील तब्बल २२ मंडळांतील हजारो शेतकरी अद्यापही पीक विम्यापासून वंचित असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या पीडित शेतकऱ्यांना तत्काळ पीक विमा मंजूर करून विम्याची रक्कम त्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस वसंत सुगावे पाटील यांनी राज्याचे कृषिमंत्री दत्ता भरणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.



मुंबई येथे कृषिमंत्री दत्ता भरणे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन वसंत सुगावे पाटील यांनी नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या अडचणी मांडल्या. जिल्ह्याला राज्यातील सर्वाधिक ८०० कोटी रुपयांचा पीक विमा मंजूर करून दिल्याबद्दल त्यांनी कृषिमंत्र्यांचे आभार मानले. मात्र, अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात विम्याची रक्कम जमा झाली असली तरी नायगाव तालुक्यातील बरबडा, घुंगराळा, नरसी यांसह जिल्ह्यातील अन्य २२ मंडळांतील पात्र शेतकरी अद्यापही विमा रकमेच्या प्रतीक्षेत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

यावेळी सुगावे पाटील यांनी सांगितले की, गेल्या हंगामात अवकाळी पाऊस, अतिवृष्टी व नैसर्गिक संकटांमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना पीकविम्याचा मोठा आधार अपेक्षित असताना अनेकांना अद्याप विमा न मिळाल्याने नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. शासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन विमा कंपनी व संबंधित प्रशासनाला तातडीने आदेश द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली.


यावर कृषिमंत्री दत्ता भरणे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत विमा न मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांची प्रकरणे तातडीने तपासून संबंधितांना लवकरात लवकर पीकविमा मंजूर करण्यात येईल व विम्याची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाईल, असे आश्वासन दिल्याची माहिती वसंत सुगावे पाटील यांनी दिली.

# अधिक मासामध्ये आनंद दत्तधाम आश्रमात लोकोपयोगी सेवा सुरू

**माहूर (प्रतिनिधी)** –सह्याद्रीच्या कुशीत अंदाजे तीस वर्षांपूर्वी सेवानिवृत्तीनंतर द.भ.प. दत्ता महाराज वसमतकर यांनी आनंद दत्तधाम आश्रम निर्माण केले आहे. या आश्रमात अधिक मासात अन्नदान सुरू आहे. या अन्नदानाचा अनेकजण लाभ घेत आहेत.

दत्तधाम आश्रमाच्या माध्यमातून मठाधिश महाराष्ट्र शासनाचे ब्रॅड अम्बेसेडर स्वच्छतादूत राष्ट्रसंत द.भ.प. साईनाथ महाराज यांच्या पुढाकाराने सप्त सूत्री उपक्रमांतर्गत व्यसन मुक्ती, स्वच्छता अभियान, शैक्षणिक परिषद, महिला सक्षमीकरण, ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल रुग्ण व नातेवाईकांना दोन्ही वेळ भोजनाचे डबे, भजन, कीर्तन, नित्य अन्नदान यासह अध्यात्मिक, धार्मिक उपक्रम राबविले जात आहेत. तसेच आश्रमाच्या वतीने अतिवृष्टी, नैसर्गिक संकटात सापडलेल्या संकटग्रस्तांना धान्याचे किट, संसारोपयोगी वस्तुंचे वाटप, तालुक्यातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले जाते. मागील दहा वर्षांपूर्वी शहरातील आदिवासी वस्तीत वास्तव्यास असलेल्या ८० वर्षाची आजीबाई व मनोरुग्ण नात या दोघींना कुणीच नसल्याने त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला होता, त्यांचेवर उपासमारीची वेळ आली होती. ही बाब कानी पडताच साईनाथ महाराजांनी तत्काळ त्यांची भेट घेऊन त्यांच्या अन्न, वस्त्राची जबाबदारी स्वीकारून त्या दोघींना दोन्ही वेळ भोजनाचे डबे पुरविले जात आहेत.

तसेच वर्षभरात संपन्न होणाऱ्या दत्तजयंती, रक्षाबंधन, शारदीय नवरात्र, गुरुपौर्णिमा यात्रेत येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. विशेषतः दर तीन वर्षांनी येणाऱ्या पुरुषोत्तम अधिक मासानिमित्त संपूर्ण महिनाभर शहर, तालुक्याला दोन्ही वेळ भोजनाचे चूल बंद निमंत्रण तसेच देशभरातून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी अन्नदान महाप्रसादाचे आयोजन केले जाते.



या आश्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे या ठिकाणी धागेदोरे, गंडे, भोंदूगिरी, बुवाबाजी, अंधश्रद्धेला मुळीच थारा नसून केवळ पारदर्शकपणे लोकोपयोगी स्तुत्य उपक्रम राबविले जात आहेत. या ठिकाणी येणाऱ्या भाविकांसाठी पावती ना देनगी असा कुठलाही आर्थिक व्यवहार केला जात नसल्याने आनंद दत्तधाम आश्रम लाखो भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे.

आनंद दत्तधाम आश्रमाचे कार्य केवळ माहुरपुरते मर्यादित नाही तर साईनाथ महाराज यांनी हजारो लोकांना सोबत घेऊन देशाच्या सीमेवर दत्तनाम सप्ताहाचे आयोजन करुन सुवर्ण मंदिरात स्वच्छता अभियान राबविले.

द.भ.प. साईनाथ महाराजांच्या गौरवशाली कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र शासनाचे ब्रँड अम्बेसेडर स्वच्छतादूत, औद्योगिक प्रशिक्षण संस्था मार्गदर्शक म्हणून पदवी बहाल करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.

दत्ता महाराज वसमतकर यांनी निर्माण केलेल्या दत्तधाम आश्रम हे लोकोपयोगी ठरले असून, या आश्रमाच्या कार्याची प्रसंसा सर्वदूर पसरली आहे. या आश्रमाच्या माध्यमातून परिसरातील नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचे कार्यही उत्तम प्रकारे होत असल्याचे अनेकांनी सांगितले.

# अंतर्मन

## श्रावणात दोन ग्रहणे!

### या वर्षातील शेवटचे सूर्यग्रहण अन् चंद्रग्रहण कधी जाणून घ्या...

**या वर्षातील शेवटचे चंद्रग्रहण आणि सूर्यग्रहण श्रावण महिन्यात होणार आहेत. भगवान शिवाच्या पवित्र महिन्यात होणारी ही ग्रहणे अनेक प्रकारे विशेष मानली जातात. हे लक्षात घेतले पाहिजे, की ज्योतिषशास्त्रीय दृष्टिकोनातून ग्रहणांना विशेष महत्त्व आहे. राहू चंद्र आणि सूर्याला ग्रहण लावतो. भगवान शिवाची उपासना करण्यासाठी श्रावण महिना अत्यंत शुभ मानला जातो. ही ग्रहणे श्रावण महिन्यातील पौर्णिमा आणि अमावस्येच्या दिवशी होतील. पौर्णिमा आणि अमावस्या हे दानधर्म आणि धार्मिक विधींसाठी विशेष मानले जातात.**



पंडित राकेश झा यांनी स्पष्ट केले, की पंचांगानुसार, सूर्यग्रहण १२ ऑगस्ट रोजी अमावस्येच्या दिवशी, तर चंद्रग्रहण २८ ऑगस्ट रोजी पौर्णिमेच्या दिवशी होईल. आपल्या पूर्वजांच्या शांतीसाठी ग्रहणाच्या दिवशी दानधर्म करता येतो. हे लक्षात घ्यावे की, दोन्ही ग्रहणे भारतात दिसणार नाहीत. १२ ऑगस्ट रोजी सूर्यग्रहण भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री ८:०४ वाजता सुरू होईल आणि पहाटे १:०७ वाजता संपेल. तर, २८ ऑगस्ट रोजी चंद्रग्रहण भारतीय प्रमाण वेळेनुसार सकाळी ८:०४ वाजता सुरू होईल आणि सकाळी ११:२२ वाजता संपेल.

#### श्रावण इतका विशेष का?

श्रावण महिन्याला पौराणिक महत्त्व आहे. याच पवित्र महिन्यात भगवान शिवाने देवी पार्वतीला आपली पत्नी म्हणून स्वीकारले होते. भगवान शिवाला पती म्हणून मिळवण्यासाठी देवी पार्वतीने १०८ वर्षे पूजा आणि नामजप केला होता. १०८ वर्षांनंतर श्रावण महिन्यातच भगवान शिवाने देवी पार्वतीला आपली पत्नी म्हणून स्वीकारले. त्यामुळे हा महिना भगवान शिवाला विशेष प्रिय आहे. म्हणूनच जे या महिन्यात भगवान शिवाची खऱ्या अर्थाने पूजा करतात, त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण होतात.

## दरवाजामागे कपडे टांगतात? जरा 'हे' वाचा, वास्तुदोष अन् आर्थिक अडचणी होतात निर्माण!



**घरात प्रवेश करताच आपण दरवाजामागील हुकांवर शर्ट, पर्स, जॅकेट इत्यादी टांगतो. हे सामान्य असले तरी, वास्तूशास्त्रानुसार हे योग्य मानले जात नाही. मुख्य दरवाजाच्या किंवा इतर कोणत्याही दरवाजांच्या मागे कपडे टांगणे शुभ नाही. असे केल्याने घरात नकारात्मक ऊर्जा निर्माण होऊ शकते आणि आर्थिक सुस्थितीवर परिणाम होऊ शकतो. वास्तुदोष निर्माण होऊ शकतात. चला, दारामागील जागेसंबंधित महत्त्वाचे वास्तु नियम आणि टिप्स सविस्तरपणे जाणून घेऊया...**



#### या वस्तू दारामागे कधीही ठेवू नका...

- झाडू आणि फरशी पुसण्याचे कापड : जर तुम्ही तुमच्या कोणत्याही दारामागे झाडू आणि फरशी पुसण्याचे कापड ठेवत असाल, तर तुम्ही ही सवय ताबडतोब बदलली पाहिजे. वास्तूनुसार, दारामागे झाडू आणि फरशी पुसण्याचे कापड ठेवल्याने देवी लक्ष्मी क्रोधित होऊ शकते. यामुळे घरात आर्थिक समस्या निर्माण होऊ शकतात.
- फाटलेले आणि जुने कपडे : तुमच्या दारामागे फाटलेले किंवा जुने कपडे कधीही टांगू नका. असे मानले जाते की असे केल्याने आर्थिक अडचणी येऊ शकतात आणि नकारात्मक ऊर्जा वाढते.
- कचरा किंवा डस्टबीन : दारामागे कोणत्याही प्रकारचा जमा झालेला कचरा कधीही ठेवू नका. त्यामुळे, दारामागे कचरापेटी कधीही ठेवू नका. असे केल्याने घरातील सकारात्मक वातावरणावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.
- बूट आणि चप्पल : वास्तूनुसार, दारामागे बूट आणि चप्पल ठेवल्याने घरातील शांतता आणि आनंदात व्यत्यय येऊ शकतो.

#### या गोष्टी लक्षात ठेवा...

- जागेच्या कमतरतेमुळे तुम्हाला दारामागे कपडे टांगावे लागत असतील, तर तिथे नेहमी धुतलेले आणि स्वच्छ कपडेच टांगा. दारामागे कधीही घाणेरडे किंवा वापरलेले कपडे टांगू नका.
- रात्रीच्या वेळी दारामागील जागेतील सर्व वस्तू काढून टाकाव्यात. रात्रीच्या वेळी ती जागा रिकामी ठेवणे योग्य मानले जाते.
- शक्य असल्यास दारामागे फक्त हलक्या रंगाचे कपडे टांगावेत. तिथे काळे, निळे किंवा इतर गडद रंगाचे कपडे कधीही टांगू नका.
- दारामागे कपडे टांगताना ते इतके जड नसावेत की त्यामुळे दार उघडण्यास अडथळा येईल, कारण दार पूर्णपणे उघडणे आवश्यक मानले जाते.

#### दारामागे कपडे का टांगू नयेत?

- आपल्या घराचे किंवा खोलीचे दार हे प्रगतीचे प्रवेशद्वार आहे. म्हणून, त्यामागे कपडे टांगल्याने करिअर आणि कामात अडचणी आणि अडथळे येऊ शकतात.
- वास्तुशास्त्रानुसार, दारामागे कपडे टांगल्याने कुटुंबातील सदस्यांच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.



#### महत्त्वाच्या वास्तू टिप्स

- नेहमी स्वच्छ ठेवा : तुमच्या घरातील प्रत्येक दार नेहमी स्वच्छ राहील याची खात्री करा. दारामागे असलेली घाण नकारात्मकता आकर्षित करू शकते.
- पुरेसा प्रकाश : तुम्ही दार उघडल्यावर दारामागील जागेत पुरेसा प्रकाश येईल याची खात्री करा.
- दारातून कोणताही आवाज येऊ नये : वास्तूशास्त्रानुसार, दार उघडताना किंवा बंद करताना कोणताही आवाज येऊ नये. यामुळे वास्तू दोष निर्माण होऊ शकतात.



## मोदींना आव्हान देण्याची ताकद थलपती विजय यांच्यात किती?

### ज्योतिषी उघड करतात, कोणाची कुंडली अधिक बलवान!

**थलपती विजय हे तामिळनाडूचे मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांची तुलना आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री एन.टी. रामाराव आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी केली जात आहे. काही ज्योतिषांनी तर असेही म्हटले आहे की ते नरेंद्र मोदींना आव्हान देऊ शकतात. चला, ज्योतिषी सचिन मल्होत्रा यांच्याकडून जाणून घेऊया की थलपती विजय आणि नरेंद्र मोदी यांच्या कुंडलीत काय साम्य आहे आणि विजय यांची कुंडली मोदी यांच्याइतकीच बलवान आहे का?**

थलपती विजय यांची तुलना राजकीय वर्तुळात आंध्र प्रदेशचे तीन वेळा मुख्यमंत्री राहिलेले आणि तेलुगू सिनेमाचे सुपरस्टार एन. टी. रामाराव (जन्म २८ मे १९२३, दुपारी ४:४३, गुडीवाडा, आंध्र प्रदेश) यांच्याशी केली जात आहे. अवघ्या दोन वर्षांपूर्वी तामिळ सिनेमाचे सुपरस्टार विजय यांनी 'तमिळगा वेत्री कळघम' (TVK) हा पक्ष स्थापन केला आणि विधानसभा निवडणुकीत १०८ जागा जिंकून सर्वांना आश्चर्यचकित केले. तामिळनाडू विधानसभेच्या गणितानुसार, सुपरस्टार विजय यांच्या TVK पक्षाला बहुमत मिळवण्यासाठी ११८ आमदारांच्या पाठिंब्याची गरज होती. तथापि, विजय यांच्या करिष्म्यामुळेच AIADMK पक्षाचे २२ आमदार आपल्या पक्षाविरुद्ध बंड करून त्यांच्या पक्षात सामील झाले आणि विजय यांनी विधानसभेत १४४ आमदारांचा पाठिंबा मिळवून सर्वांना चकित केले. जवळपास ४० वर्षांपूर्वी २९ मार्च १९८२ रोजी आंध्र प्रदेशात तत्कालीन तेलुगू चित्रपट सुपरस्टार एन. टी. रामाराव यांनी तेलुगू देसम पार्टीची (टीडीपी) स्थापना केली आणि अवघ्या नऊ महिन्यांनंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव करून ९ जानेवारी १९८३ रोजी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. एन. टी. रामाराव तिथेच थांबले नाहीत तर १९८४ च्या अखेरीस तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर झालेल्या निवडणुकीत त्यांच्या पक्षाने आंध्र प्रदेशातील ३४ पैकी ३० लोकसभा जागा जिंकल्या आणि राष्ट्रीय राजकारणातही मोठे स्थान मिळवले.

तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय (जन्म २२ जून १९७४, सकाळी ९:२५ वाजता, चेन्नई, तामिळनाडू) यांच्या जन्मपत्रिकेत चंद्र आणि मंगळाचा बलवान राजयोग आहे, जो पंतप्रधान नरेंद्र मोदी (जन्म १७ सप्टेंबर १९५०, सकाळी ११ वाजता, वडनगर, गुजरात) यांच्या जन्मपत्रिकेसारखाच आहे. यामुळे दक्षिण भारतीय ज्योतिष विश्वात, भविष्यात केंद्रात मोदींना आव्हान देणारे नेते म्हणून त्यांना सादर केले जात आहे. ज्योतिषशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास सी. जोसेफ विजय यांच्या राजकीय कारकिर्दीत काही आश्चर्यकारक शक्यता दडलेल्या आहेत.

#### शकट योगामुळे संघर्ष

थलपती विजय यांच्या जन्मपत्रिकेतील बलवान राजयोगामुळे ते दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात मोठे आणि सर्वात महागडे अभिनेते बनले आहेत. तथापि, राजकीय दृष्टिकोनातून पाहिल्यास त्यांच्या कुंडलीत चंद्रापासून आठव्या स्थानातील गुरू 'शकट योग' तयार करत आहे, जो मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात काही संघर्षाचे संकेत देतो. सत्तेचे प्रतीक असलेला सूर्य, हानीच्या बाराव्या स्थानात असून, गुलिकासोबत समान अंशांवर युती करत आहे. शिवाय सूर्याने शनीला अस्तंगत केले आहे, ज्यामुळे शत्रूंचे अडथळे आणि अंतर्गत घातपाताचा योग तयार झाला आहे. २०२९-३० या वर्षात शुक्रात शनीच्या विंशोत्तरी दशेत, त्यांना त्यांच्याच पक्षातील काही नेत्यांमुळे राजकीय नुकसान सोसावे लागण्याची शक्यता आहे.

#### भविष्यात भाजपला आव्हान देऊ शकतील?

पंतप्रधान मोदींना कुंडलीतील गजकेसरी योग, अमलकीर्ती योगांनी मोठ्या उंचीवर पोहोचवले आहे. प्रथम त्यांनी तीन वेळा गुजरातचे मुख्यमंत्रीपद भूषवले आणि आता त्यांना सलग तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्यांच्या जन्मपत्रिकेत चंद्र आणि मंगळ या सर्वात शुभ ग्रहांची विंशोत्तरी दशा योग्य वेळी लाभली, ज्यामुळे त्यांना तीन लोकसभा निवडणुका जिंकता आल्या. दुसरीकडे, सी. जोसेफ विजय यांच्या जन्मपत्रिकेत या योगांचा अभाव आहे



आणि ते सध्या शुक्रातील शनीच्या कठीण काळातून जात आहेत, त्यामुळे ज्योतिषशास्त्रानुसार, नजीकच्या भविष्यात ते केंद्रात भाजपला आव्हान देतील अशी शक्यता नाही. तथापि, एन. टी. रामाराव यांच्याप्रमाणेच तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांना विंशोत्तरी दशेसह शुक्राच्या दीर्घकाळ टिकणाऱ्या 'धन योगा'चा लाभ मिळत आहे. यामुळे ते आपल्या राजकीय कारकिर्दीत एकापेक्षा जास्त वेळा मुख्यमंत्री बनू शकतील. तामिळनाडू लोकसभा निवडणुकीतील त्यांच्या पक्षाच्या दमदार कामगिरीमुळे ते भविष्यात दक्षिण भारतातील एक प्रमुख नेते म्हणून प्रस्थापित होऊ शकतात.

## या तारखांना जन्मलेल्या मुली असतात अत्यंत हुशार!

### करिअर किंवा घरात नेहमीच राहतात नंबर 1

**प्रत्येक मुलीमध्ये काही ना काही खास वैशिष्ट्ये असतात. तथापि, काही मुली अशा असतात ज्या गर्दीतून वेगळ्या उठून दिसतात आणि करिअर असो वा घर, सर्वत्र उत्कृष्ट कामगिरी करतात. ग्रहांसोबतच तुमची जन्मतारीख देखील यात महत्त्वाची भूमिका बजावते. अंकशास्त्रानुसार, तुमची जन्मतारीख तुमच्याबद्दल बरेच काही सांगते. अंकशास्त्र काही विशिष्ट तारखा उघड करते, ज्यामुळे एखादी व्यक्ती लाखो लोकांच्या गर्दीतही उठून दिसते. चला वास्तु आणि अंकशास्त्र तज्ज्ञांकडून जाणून घेऊया की कोणत्या तारखांना जन्मलेल्या मुली प्रत्येक क्षेत्रात प्रथम येतात आणि मोठे यश मिळवतात...**



- मूलांक १ (कोणत्याही महिन्याच्या १, १०, १९, २८ तारखेला जन्म) : जर तुमचा जन्म कोणत्याही महिन्याच्या १, १०, १९ किंवा २८ तारखेला झाला असेल तर तुमचा मूलतत्त्व क्रमांक १ असेल. १+० = १, १+९ = १०, १+० = १. हे लक्षात घ्यावे की अंकशास्त्रानुसार, मूलतत्त्व क्रमांक १ हा सूर्याचा अंक आहे. अंक १ असलेल्या मुली जन्मजात नेत्या असतात. त्यांना दुसऱ्याच्या हाताखाली काम करायला आवडत नाही. त्या त्यांच्या करिअरमध्ये मोठे यश मिळवतात. नोकरी असो वा व्यवसाय, त्या सर्वोच्च पदांवर पोहोचतात. त्यांच्यामध्ये एक अद्वितीय आत्मविश्वास असतो. या मुली अत्यंत कठीण कामे स्वीकारायलाही मागे हटत नाहीत. सूर्याच्या प्रभावामुळे, त्यांना समाजात प्रचंड आदर आणि प्रतिष्ठा मिळते.
- मूलांक ३ (जन्म तारीखः ३, १२, २१, ३०) : जर तुमचा जन्म कोणत्याही महिन्याच्या ३, १२, २१ किंवा ३० तारखेला झाला असेल, तर तुमचा अंक ३ आहे. अंक ३ चा अधिपती ग्रह गुरु आहे. गुरुच्या प्रभावामुळे अंक ३ असलेल्या मुली अत्यंत तल्लख बुद्धीच्या असतात आणि त्यांच्याकडे ज्ञानाचा खजिना असतो. या मुली एकाच वेळी अनेक कामे हाताळू शकतात. त्या आपले घर, कुटुंब आणि करिअर सहजतेने सांभाळतात. अंक ३ असलेल्या मुली आपल्या संभाषणाने कोणालाही मोहित करतात. आर्थिक बाबतीत त्या खूप भाग्यवान असतात. व्यवसायात त्यांची बुद्धी तल्लख असते. गुरूच्या प्रभावामुळे त्यांना चांगला नफा मिळतो.
- मूलांक ५ (जन्म तारीख ५, १४, २३) : जर तुमचा जन्म कोणत्याही महिन्याच्या ५, १४ किंवा २३ तारखेला झाला असेल, तर तुमचा अंक ५ आहे. अंक ५ चा अधिपती ग्रह बुध आहे. अंक ५ असलेल्या मुली खूप व्यावसायिक वृत्तीच्या असतात. त्या आकडेमोड आणि स्मार्ट कामात पारंगत असतात. त्यांच्याकडे निर्णय घेण्याची तीव्र क्षमता असते. परिस्थिती कोणतीही असो, त्या जलद आणि अचूक निर्णय घेतात. त्या समोर येणाऱ्या वातावरणाशी जुळवून घेतात. या मुलींना प्रत्येक परिस्थितीत चांगले जुळवून कसे घ्यावे हे माहित असते. या सवयीमुळे त्या सर्वांच्या आवडत्या बनतात. बुध ग्रहाच्या प्रभावामुळे त्या व्यापार, वित्त आणि कॉर्पोरेट क्षेत्रात चांगली कामगिरी करतात आणि नेहमीच अव्वल ठरतात.
- मूलांक ६ (जन्म तारीख ६, १५, २४) : जर एखाद्याचा जन्म कोणत्याही महिन्याच्या ६, १५ किंवा २४ तारखेला झाला असेल, तर त्यांचा अंक ६ असतो. अंक ६ असलेल्या मुलींचे व्यक्तिमत्त्व खूप आकर्षक असते. लोक त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने आणि रूपाने सहज प्रभावित होतात. त्यांना ऐषारामाची आवड असते आणि त्यांच्या कठोर परिश्रमातून सर्व काही मिळवण्याची क्षमता त्यांच्यात असते. त्या त्यांच्या कठोर परिश्रमातून एक आलिशान जीवनशैली प्राप्त करतात. त्या फॅशन, मीडिया आणि कला यांसारख्या सर्जनशील क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करतात आणि त्यांच्या अद्वितीय कल्पनांद्वारे यश मिळवतात. शुक्र ग्रहाच्या प्रभावामुळे त्यांना पैशाची कधीही कमतरता भासत नाही.

## भगवद्गीता : मोक्ष आणि यशाचे रहस्य गीतेच्या या 6 अध्यायांत दडलेले

श्रीमद् भगवद्गीता हा एक अलौकिक ग्रंथ आहे, त्याचे वैभव अथांग आणि अमर्याद आहे. गीतेच्या पहिल्या अध्यायापासून ते बाराव्या अध्यायापर्यंतचे सार जाणून घेतल्यानंतर तेराव्या अध्यायापासून ते अठराव्या अध्यायापर्यंतचे सार आत्मसात केल्यावर मनुष्याला या जगात आपोआप यश मिळते आणि अंतिमतः जीवनाचा सागर पार करण्याचा मार्ग, म्हणजेच मोक्षाचा मार्ग मिळतो.

- गीतेचा तेरावा अध्याय : या अध्यायात भगवान श्रीकृष्णांनी सांगितले आहे, की हे शरीर चोवीस तत्त्वांनी बनलेले आहे आणि मीच ते जाणणारा या क्षेत्रातील तज्ज्ञ आहे.
- चौदावा अध्याय : या अध्यायात भगवान सांगतात की सर्व प्राणी निसर्ग आणि मनुष्य यांच्या संयोगातून जन्माला आले आहेत.
- पंधरावा अध्याय : हा अध्याय जग कसे आहे, आत्म्याचे स्वरूप काय आहे आणि जगातून मुक्ती व आत्मज्ञान कसे मिळवावे हे स्पष्ट करतो.
- सोळावा अध्याय : जगात दोन प्रकारचे लोक आहेत. एक दैवी स्वभावाचे आणि दुसरे आसुरी स्वभावाचे, म्हणजेच चांगले आणि वाईट.
- सतरावा अध्याय : हा अध्याय यज्ञ, कीर्तन, तपश्चर्या, दान आणि अन्नग्रहण कसे करावे हे स्पष्ट करतो.
- अठरावा अध्याय : या अध्यायात, भगवान त्याग आणि वैराग्याचे सार स्पष्ट करतात. यज्ञ, दान आणि तपश्चर्या यांसारखी विहित कार्ये कोणत्याही इच्छेशिवाय केली पाहिजेत.

# पुलवामा हल्ल्याचा सूत्रधार हमजा बुरहानची हत्या

## पीओकेमध्ये अज्ञात हल्लेखोरांनी झाडल्या गोळ्या





**श्रीनगर (प्रतिनिधी)** – १४ फेब्रुवारी २०१९ च्या पुलवामा दहशतवादी हल्ल्याशी संबंधित असलेला दहशतवादी हमजा बुरहान याची पाक व्याप्त काश्मीरमध्ये गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मुझफ्फराबादमध्ये अज्ञात हल्लेखोरांनी हमजा बुरहानला लक्ष्य केले, यामध्ये त्याचा जागीच मृत्यू झाला.

हमजा बुरहान हा पाकिस्तानमधील दहशतवादी नेटवर्कशी जोडलेला होता आणि पुलवामा हल्ल्याच्या कटात त्याची मुख्य भूमिका मानली जात होती. १४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मू-काश्मीरमध्ये पुलवामा हल्ला झाला होता, ज्यामध्ये सीआरपीएफचे ४० जवान शहीद झाले होते. या हल्ल्याने संपूर्ण देश हादरला होता आणि यानंतर भारताने बालाकोट एअरस्ट्राइक करून दहशतवाद्यांच्या तळांना लक्ष्य केले होते. सूत्रांनुसार, हमजा बुरहान बऱ्याच काळापासून सुरक्षा यंत्रणांच्या रडारवर होता. त्याची हत्या अशा वेळी झाली आहे, जेव्हा पाकिस्तानमध्ये दहशतवादी संघटना आणि कट्टरपंथी नेटवर्कशी संबंधित अनेक लोकांवर गूढ हल्ले होण्याच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. अलीकडच्या वर्षांत अनेक दहशतवाद्यांचा एकतर गँगवॉरमध्ये मृत्यू झाला आहे किंवा अज्ञात हल्लेखोरांनी त्यांना लक्ष्य केले आहे. मुझफ्फराबादमध्ये घडलेल्या या घटनेनंतर परिसरात सुरक्षा वाढवण्यात आली आहे. मात्र, हल्लेखोरांची ओळख आणि या हल्ल्यामागचे नेमके कारण काय, याबाबत अद्याप कोणतीही स्पष्ट माहिती समोर आलेली नाही.

मुझफ्फराबादमध्ये झालेल्या हल्ल्यात 'डॉक्टर' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या हमजा बुरहानला अनेक गोळ्या लागल्या आहेत. मूळचा पुलवामाचा रहिवासी असलेल्या हमजा बुरहानचे खरे नाव अर्जुमंद गुलजार दार असून, केंद्रीय गृह मंत्रालयाने २०२२ मध्ये त्याला दहशतवादी घोषित केले होते.

# गोवंशाची अवैध वाहतूक करणाऱ्यांना आता 'मकोका' लागणार!

**मुंबई (प्रतिनिधी)** – गोवंशाची अवैध वाहतूक आणि कत्तल करणारे, त्यासोबतच अनधिकृतरित्या उभारण्यात आलेल्या कत्तलखान्यांना कायमचा पायबंद घालण्यासाठी गृह विभागाने मार्गदर्शक नियमावली (शासन परिपत्रक) जारी केली. त्यानुसार, प्रचलित कायदे धाब्यावर बसवून वारंवार संघटित पद्धतीने गोतस्करी करणाऱ्या व्यक्ती, टोळ्या किंवा संघटनांविरुद्ध आता थेट 'महाराष्ट्र संघटित गुन्हे नियंत्रण अधिनियम' अर्थात 'मकोका' अंतर्गत कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीस प्रशासनाला देण्यात आले आहेत.

राज्यात होणारी गोतस्करी, गोवंशीय जनावरांची अवैधरित्या होणारी वाहतूक आणि अनधिकृत कत्तलखान्यांवर तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी, अशी निवेदने हिंदुत्ववादी संघटनांकडून सातत्याने प्राप्त होत होती. या गंभीर प्रकारांमुळे अनेक भागांत कायदा व सुव्यवस्थेचा मोठा प्रश्न उपस्थित होत होता. हीच बाब लक्षात घेऊन संविधानाच्या अनुच्छेद ४८ मधील मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरून दुभत्या जनावरांचे, विशेषतः गाई व वासरांचे रक्षण, जतन व संवर्धन करण्यासाठी गृह विभागाने हे व्यापक पाऊल उचलले आहे. गुरुवारी जारी करण्यात आलेल्या अधिकृत परिपत्रकाची राज्यभरात तातडीने आणि काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

शासनाने स्पष्ट केले आहे की, राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती आणि जिल्हा परिषदांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत तथा विनापरवाना चालणारे कत्तलखाने शोधून त्यांच्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करावी. कोणत्याही भागात एकही बेकायदेशीर कत्तलखाना कार्यरत राहणार नाही, याची संपूर्ण जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोपवण्यात आली आहे. तसेच, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ आणि प्राण्यांना निर्दयपणे वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० मधील तरतुदींचे पालन करणे सर्व क्षेत्रीय कार्यालयांना बंधनकारक करण्यात आले आहे.

# एअर इंडियाच्या विमानाची धावपट्टीला धडक

**बंगळुरू (प्रतिनिधी)** – दिल्लीहून बंगळूरुला येणाऱ्या एअर इंडियाचे विमान लँडिंग करताना तांत्रिक बिघाड झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. एअर इंडियाचे फ्लाइट एआय २६५१ बंगळूरु विमानतळावर लँडिंग करत असताना विमानाच्या शेपटीचा भाग धावपट्टीला घासल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर विमानतळावर काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

एअर इंडियाने दिलेल्या माहितीनुसार, विमान सुरक्षितपणे उतरले असले तरी लँडिंगदरम्यान तांत्रिक अडचण निर्माण झाली. विमानाचा मागील भाग धावपट्टीला स्पर्श झाल्यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून विमान तातडीने जमिनीवरच थांबवण्यात आले. त्या वेळी विमानात प्रवासी आणि कर्मचाऱ्यांसह एकूण १७९ जण उपस्थित होते. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा गंभीर दुखापत झाली नाही.


## नोकरीची सुवर्णसंधी

Confectionery, गोळी-बिस्कीट, मिठा पान चटणी,
किराणा व पान शॉपच्या वस्तूंच्या मार्केटिंगसाठी
मेहनती, हुशार व सुशिक्षित मुलांची आवश्यकता आहे.
कामाचे ठिकाण: नांदेड शहर व जिल्हा
पगार: रू.१५,००० ते रू.१८,००० पर्यंत
व्यवसायावर आकर्षक बोनस देखील दिला जाईल
उमेदवाराकडे स्वतःचे टू-व्हीलर असणे आवश्यक
इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा:
**फ्रेंड्स जर्दा स्टोअर जुना मोंढा, नांदेड**
**मोबाईल: ८६८८९६९७५५**


# काँग्रेसच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांसाठी २६ ते ३० मे दरम्यान प्रशिक्षण कार्यशाळा

## प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यात काँग्रेस पक्षाची संघटना अधिक सक्षम आणि सक्रिय करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या संघटन सृजन अभियान अंतर्गत राज्यात सात हजार नविन पदाधिकारी नियुक्तीची प्रक्रिया सुरु आहे. या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने विशेष प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रदेश काँग्रेस मुख्यालय टिळक भवन, दादर येथे २६ मे ते ३० मे २०२६ या कालावधीत विविध विभागांच्या ब्लॉक अध्यक्ष व ब्लॉक कार्याध्यक्षांसाठी विभागनिहाय एकदिवसीय कार्यशाळा पार पडणार आहेत.

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येणाऱ्या या कार्यशाळांमध्ये संघटनात्मक बांधणी, पक्षविस्तार, जनसंपर्क, सोशल मीडिया संवाद, बूथस्तरीय नियोजन आणि विविध समाजघटकांशी समन्वय यांसारख्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती यामध्ये सहभागी होऊन पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणार आहेत.

२६ मे सोशल मीडिया विभाग, २७ मे ओबीसी विभाग, २९ मे अनुसूचित जाती विभाग, ३० मे अल्पसंख्याक विभाग अशा वेळापत्रकानुसार कार्यशाळा संपन्न होईल. प्रत्येक दिवशी सकाळी १० वाजल्यापासून नोंदणी प्रक्रिया सुरू होणार असून दिवसभर विविध सत्रांद्वारे प्रशिक्षण दिले जाईल. कार्यशाळेचा समारोप सायंकाळी ४.३० वाजता होणार आहे. प्रदेश काँग्रेसच्या प्रशिक्षण विभागाचे प्रमुख आशुतोष शिर्के यांच्या पुढाकाराने या कार्यशाळांचे नियोजन करण्यात आले असून नव्या पदाधिकाऱ्यांना संघटनात्मक कामासाठी सक्षम करण्याचा हा प्रयत्न असल्याची माहिती प्रदेश उपाध्यक्ष (संघटन व प्रशासन) ॲड. गणेश पाटील यांनी दिली.

## जाहीर प्रगटन

मौजे असदुल्लाबाद ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील गट नं. ३७ सीटी सर्व्हे नं. १००१५ मधील नाईकनगर मधील प्लॉट नं. १११-अ ज्याची साईज लांबी - पूर्व पश्चिम - ५३ फुट व रूंदी दक्षिण- उत्तर- २४ फुट ६ इंच सदर प्लॉट कांताबाई विश्वनाथ गांजुरे रा. नाईकनगर नांदेड यांचेकडून माझे पक्षकाराने विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतुःसिमा- पूर्वेस - प्लॉट नं. ११०, पश्चिमेस - २० फुट रूंद रोड, दक्षिणेस - प्लॉट नं. १०७ व १०८, उत्तरेस - प्लॉट नं. १११ ब आहे.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**ॲड. सावित्री जोशी**
**गोकुळ निवास, सोमेश कॉलनी, कलामंदिर नांदेड**
**मो.नं. ९४२१७६१८९८, ९४२००९०१९८, ९३०९१२००९४**

नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.
जाहिरात प्रगटन
(नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, रत्नमाला गणेश राघेवाड यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (२३४), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (१६८) मालमत्ता नं. (एच-१०५२/३१) नवीन वार्ड क्र. (१६) नवीन मालमत्ता नं. (१०५२/३१) साईज पूर्व-पश्चिम .... मीटर, दक्षिण-उत्तर ..... मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : प्लॉट नं. १८७,
पश्चिमेस : ६.१० मीटरचा रस्ता,
दक्षिणेस : मोकळी जागा, उत्तरेस : प्लॉट नं. १६९.

श्री शिवकुमार जयप्रकाश हिरेमठ, रमेश जयप्रकाश हिरेमठ यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.


त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## Change In Name

My old name is SHAIKH ZAKIUDDIN SHAIKH MOINUDDIN Which now I am changing to my new name SHAIKH ZAKIUDDIN. henceforth all his official correspondence will be done as per the new name. Please consider this public declaration.

Address - H.No. 9-4-936, Madina Nagar, Degloor Naka, Itwara Nanded 431604
Mo.No. 9325100023

## टी.सी. हरवली

विनोद धोंडीबा जोमेगावे यांची १० वी पासची टि सी शंकरनगर ते नरसी बस मध्ये प्रवास करतेवेळेस हरवलेली आहे तरी कोनाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

विनोद धोंडीबा जोमेगावे रा रामतीर्थ
ता.बिलोली. जि.नांदेड

## जाहीर प्रगटन

तत्पर नागरी सहकारी पतसंस्था म. सहयोग नगर, नांदेड ता. जि. नांदेड या संस्थेच्या सर्व सभासद/मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणुक सन २०२६-२०३१ या कालावधीचा निवडणुक कार्यक्रम दिनांक २१/०५/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येत असुन उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा कालावधी दिनांक २२/०५/२०२६ ते २९/०५/२०२६ आहे. प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक ०१/०६/२०२६ रोजी करण्यात येणार असुन वैध नामनिर्देशन पत्राची यादी दि. ०२/०६/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी दिनांक ०२/०६/२०२६ ते १६/०६/२०२६ आहे. निवडणुक लढविणा-या उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतीम यादी प्रसिध्दी दिनांक १७/०६/२०२६ करण्यात येणार आहे. आवश्यकता असल्यास मतदान दिनांक २७/०६/२०२६ रोजी उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे कार्यालयात घेण्यात येणार असुन मतदान संपल्यानंतर लगेच मतमोजणी करण्यात येणार आहे. व निकाल जाहीर करण्यात येणार आहे संस्थेच्या निवडणुकीचा निवडणुक कार्यक्रम संस्थेच्या व उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे कार्यालयाचे नोटीस बार्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे यांची सर्व सभासद/मतदारांना नोंद घ्यावी.

**(एस.एस.जळके)**
**निवडणुक निर्णय अधिकारी**
**तत्पर नागरी सहकारी पतसंस्था,**
**म. सहयोग नगर, नांदेड ता. जि. नांदेड**

## जाहीर प्रगटन

दि डायमंड को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि. नांदेड या संस्थेच्या सर्व सभासद/मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणुक सन २०२६-२०३१ या कालावधीचा निवडणुक कार्यक्रम दिनांक २२/०५/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येत असुन उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा कालावधी दिनांक २५/०५/२०२६ ते ०१/०६/२०२६ आहे. प्राप्त नामनिर्दशन पत्राची छाननी दिनांक ०२/०६/२०२६ रोजी करण्यात येणार असुन वैध नामनिर्देशन पत्राची यादी दि. ०३/०६/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी दिनांक ०३/०६/२०२६ ते १७/०६/२०२६ आहे. निवडणुक लढविणा-या उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतीम यादी प्रसिध्दी दिनांक १८/०६/२०२६ करण्यात येणार आहे. आवश्यकता असल्यास मतदान दिनांक २८/०६/२०२६ रोजी दि डायमंड को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि. नांदेड यांचे कार्यालयात घेण्यात येणार असुन मतदान संपल्यानंतर लगेच मतमोजणी करण्यात येणार आहे. व निकाल जाहीर करण्यात येणार आहे संस्थेच्या निवडणुकीचा निवडणुक कार्यक्रम संस्थेच्या व उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे कार्यालयाचे नोटीस बार्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे यांची सर्व सभासद/मतदारांना नोंद घ्यावी.

**(एम.आर.येवते)**
**निवडणुक निर्णय अधिकारी**
**दि डायमंड को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि. नांदेड.**

## जाहीर प्रगटन

तिरुपती नागरी सहकारी पतसंस्था म. सन्मित्रनगर, नांदेड या संस्थेच्या सर्व सभासद/मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणुक सन २०२६-२०३१ या कालावधीचा निवडणुक कार्यक्रम दिनांक २२/०५/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येत असुन उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा कालावधी दिनांक २५/०५/२०२६ ते ०१/०६/२०२६ आहे. प्राप्त नामनिर्दशन पत्राची छाननी दिनांक ०२/०६/२०२६ रोजी करण्यात येणार असुन वैध नामनिर्देशन पत्राची यादी दि. ०३/०६/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी दिनांक ०३/०६/२०२६ ते १७/०६/२०२६ आहे. निवडणुक लढविणा-या उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतीम यादी प्रसिध्दी दिनांक १८/०६/२०२६ करण्यात येणार आहे. आवश्यकता असल्यास मतदान दिनांक २८/०६/२०२६ रोजी उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे कार्यालयात घेण्यात येणार असुन मतदान संपल्यानंतर लगेच मतमोजणी करण्यात येणार आहे. व निकाल जाहीर करण्यात येणार आहे संस्थेच्या निवडणुकीचा निवडणुक कार्यक्रम संस्थेच्या व उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे कार्यालयाचे नोटीस बार्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे यांची सर्व सभासद/मतदारांना नोंद घ्यावी.

**(जी. यु. कुटे)**
**निवडणुक निर्णय अधिकारी**
**तिरुपती नागरी सहाकारी पतसंस्था म. सन्मित्रनगर, नांदेड.**

## Change In Name

My old name is TOKALWAD ARUN BHAGAVAN Which now I am changing to my new name ARUN BHAGWAN TOKALWAD. henceforth all his official correspondence will be done as per the new name. Please consider this public declaration.

Address - S/o. Bhagwan tokalwad,at Rautkhed, Rautkheda po kandhar nanded maharashtra 431714

## Change In Name

My old name is KAGANE ASHOK DEVARAO Which now I am changing to my new name ASHOK DEVRAO KAGNE. henceforth all his official correspondence will be done as per the new name. Please consider this public declaration.

Address - S/OAshokrao kagne Muktai Nagar Kandhar nanded maharashtra 431714

जा.क्रं.नांवाशमनपा/क्षे.का.01/नापवि/298 /2026
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
दिनांक:- 14-5-2026

**जाहीर प्रगटन**

संचिका क्रं. NT/01/13555 /क्षे.का.क्रं.1 तरोडा-सांगवी

प्रकरण:-नाव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाच्या अधारे सर्व जनतेस कळविण्यात येते श्री/सौ. शेख दस्तगीर पि. शेख मोहमंदसाब रा. तरोडा बु. नांदेड या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, ता.नि.भु.अ. पत्र क्रं. 1051/09 दि.30/10/2009 तरोडा बु. गट नं. 167 पैकी प्लॉट क्रं. 22 चा भाग पिन क्र. 40113050065 श्री/सौ. वसीमखान अमानुल्लाखांन यांच्या नावे असलेली मालमता यांचेकडुन अर्ज खरेदीखत क्रं. 1043 दि.24.02.2015 च्या आधारे विकत घेतली आहे / वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आ-कारणी नोंद वहीत घेण्यासाठी जाहिरप्रगटन देण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून (15) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. अन्यथा अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नांवे वरील प्रमाणे मालमता नोंदविण्यात येईल.

चतु:सिमा :-
पुर्व :- 20 फुट रुंद रोड आहे.
पश्चिम :- गट नं. 167 चा भाग आहे.
दक्षीण :- प्लॉट नं. 23 आहे.
उत्तर :- प्लॉट नं. 22 चा उर्वरीत भाग आहे.

सहाय्यक आयुक्त
क्षे.का.क्रं.01 तरोडा सांगवी,
नांदेड वाघाळा शहर महानरलिका,नांदेड

जा.क्रं.नांवाशमनपा/क्षे.का.01/नापवि/270 /2026
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
दिनांक:- 14-5-2026

**जाहीर प्रगटन**

संचिका क्रं. NT/01/13608/क्षे.का.क्रं.1 तरोडा-सांगवी

प्रकरण:-नाव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाच्या अधारे सर्व जनतेस कळविण्यात येते श्री/सौ श्रीनिवास भगवानराव राजेगोरे रा. तरोडा बु. नांदेड या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, ता.नि.भु.अ. पत्र क्रं. 1051/09 दि.30/10/2009 तरोडा बु. गट नं. 205 पैकी प्लॉट क्रं. 12 चा द भाग पिन क्र. 40103071828 श्री/सौ. गणपती शेषेराव कल्याणकर यांच्या नावे असलेली मालमता यांचेकडुन अर्ज खरेदीखत क्रं. 11474 दि.17.11.2023 च्या आधारे विकत घेतली आहे / वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आ-कारणी नोंद वहीत घेण्यासाठी जाहिरप्रगटन देण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून (15) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. अन्यथा अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नांवे वरील प्रमाणे मालमत्ता नोंदविण्यात येईल.

चतु:सिमा :-
पुर्व :- प्लॉट नं. 13 व 14 आहे.
पश्चिम :- 25 फुट रुंद रोड आहे.
दक्षीण :- प्लॉट नं. 08 आहे.
उत्तर :- प्लॉट नं. 12 चा उर्वरीत भाग आहे.

प्रति,

सहाय्यक आयुक्त
क्षे.का.क्रं.01 तरोडा सांगवी,
नांदेड वाघाळा शहर महानरलिका,नांदेड

नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.
जाहिरात प्रगटन
(नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, व्यंकटेश पुंजाराम जाधव यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (.....), जुना वार्ड नं. (०३) मधील प्लॉट नं. (....) मालमत्ता नं. (१५१४) नवीन वार्ड क्र. (०२) नवीन मालमत्ता नं. (१८४५) साईज पूर्व-पश्चिम ३० फुट, दक्षिण-उत्तर ४० फुट.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : २० फुटाचा रस्ता, पश्चिमेस : चंद्रकांत कदम यांचा प्लॉट, दक्षिणेस : श्रीराम ससेवाड यांचा प्लॉट, उत्तरेस :१० फुटाचा रस्ता.

श्री पुंजाराम चांदराव जाधव यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.
जाहिरात प्रगटन
(नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, गणेश गंगाधरराव हनयागने यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (२५), गट नं. (२५४), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (८८) मालमत्ता नं. (एच-९५) नवीन वार्ड क्र. (१६) नवीन मालमत्ता नं. (२३०५/१) साईज पूर्व-पश्चिम ३० फुट, दक्षिण-उत्तर ४० फुट.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : प्लॉट नं. ८९,
पश्चिमेस : प्लॉट नं. ८७,
दक्षिणेस : ३० फुट रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. ८३.

सौ. शोभा दुर्गादास यन्नावार यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.
जाहिरात प्रगटन
(नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, तुकाराम संभाजी कोष्टलु, केशव सटवाजी लक्कडवाड यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (५१३), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (....) मालमत्ता नं. (डी-७७४/३१) नवीन वार्ड क्र. (०१) नवीन मालमत्ता नं. (४०१०/८२) साईज पूर्व-पश्चिम १२.८० मीटर, दक्षिण-उत्तर ७.६२ मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : गट नं. ५१३
पश्चिमेस : २० फुट रस्ता,
दक्षिणेस : प्लॉट क्र. ०६, उत्तरेस : प्लॉट नं. ०४.

श्री बालाजी यशवंतराव बुरकुले यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**

नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.
जाहिरात प्रगटन
(नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उबेद अहेमद शेख सलीम यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (१०६), जुना वार्ड नं. (०३) मधील प्लॉट नं. (०८) मालमत्ता नं. (१९०८/२४२) नवीन वार्ड क्र. (०२) नवीन मालमत्ता नं. (१११४/२४२) साईज पूर्व-पश्चिम ४० फुट, दक्षिण-उत्तर ३० फुट.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : प्लॉट नं. ०३,
पश्चिमेस : रस्ता,
दक्षिणेस : प्लॉट नं. ०७, उत्तरेस : प्लॉट नं. ०९.

श्री महेबुब जानी मोहियोद्दीन यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.

त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# मनपा आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली मान्सूनपूर्व आढावा बैठक संपन्न

## ◆ सर्व विभाग प्रमुखांना विशेष खबरदारीचे निर्देश

**नांदेड (प्रतिनिधी)** –आगामी मान्सूनचा संभाव्य धोका आणि नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्यासाठी महानगरपालिकेमध्ये आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या अध्यक्षतेखाली दि.२१ मे रोजी 'शहरी आपत्ती व्यवस्थापन समितीची' विशेष आढावा बैठक पार पडली. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर, आपत्ती व्यवस्थापनांतर्गत पालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली आहे. संभाव्य नैसर्गिक आपत्तींचा सामना प्रभावीपणे करण्यासाठी, तसेच शहरातील नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करून जीवित व वित्तहानी टाळणे हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता. पावसाळ्यात शहरातील नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता प्रत्येक विभागाने घ्यावी. कामात निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे कडक निर्देश यावेळी पालिका आयुक्तांनी दिले आहेत.



या बैठकीमध्ये शहरातील रस्ते, नालेसफाई, पाणीपुरवठा, आणि आपत्कालीन यंत्रणांच्या सज्जतेबाबत सर्व विभागांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण आणि महानगरपालिका यांनी आपापसात योग्य समन्वय साधून शहरातील रस्ते आणि खोदकामांची अर्धवट असलेली कामे तत्काळ पूर्ण करावीत. शहरातील सखल भागात पावसाचे पाणी साचून नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून मुख्य आणि अंतर्गत नाल्यांची सफाई युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे आदेश दिले. नाल्यांच्या प्रवाहात असणारे सर्व अडथळे तत्काळ हटवावेत. पावसाळ्यात वादळी-वाऱ्यामुळे होर्डिंग पडण्याच्या दुर्घटना टाळण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सर्वेक्षण करून अनधिकृत व धोकादायक होर्डिंग्जवर तत्काळ कारवाईचा बडगा उगारण्याचे निर्देश देण्यात आले. महानगरपालिकेच्या वतीने २४ तास कार्यरत असणारा मध्यवर्ती आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष तत्पर ठेवण्यात आला आहे. नागरिकांसाठी ०२४६२-२६२६२६ हा हेल्पलाइन क्रमांक कार्यान्वित करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे शहरातील अतिधोकादायक आणि जुन्या इमारतींना नोटिसा बजावून, पावसाळ्यापूर्वी आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आल्या.

नांदेड शहरातून वाहणारी गोदावरी नदीची इशारा पातळी ३५१ मीटर असून धोका पातळी ही ३५४ मीटर आहे. नदीच्या पुरामुळे बाधीत होणाऱ्या घरांची संख्या २७७२ असून, या सर्व रहिवाशांना क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी नोटीसीचे वाटप करण्याबाबत बैठकीत निर्देशीत करण्यात आले. त्याचप्रमाणे अतिवृष्टीमुळे अथवा नदीच्या पूरपरिस्थितीमुळे शहरातील विविध भाग प्रभावित होत असतात. त्या सखल भागांमध्ये विशेष खबरदारीच्या उपाययोजना करण्याचे आदेश यावेळी आयुक्तांनी सर्व क्षेत्रिय अधिकारी यांना दिले आहेत. तसेच शहरात अतिवृष्टीच्या काळात रोगांचा प्रादुर्भाव होणार नाही यासाठी मलेरिया विभागामार्फत वेळोवेळी फवारणी, पावसाळ्यात नागरिकांना स्वच्छ पाणी पुरवठा, पावसाळ्यात वादळी वाऱ्यामुळे होर्डींग्स विविध प्रकारचे सुचना फलक पडून दुर्घटना घडणार नाही, त्याच- प्रमाणे मनपा हद्दीतील जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन नोटीसा बजावण्याच्या सुचना यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर मान्सूनपूर्व नियोजनातील सुक्ष्म पद्धतीने छोटे-मोठे नाले, जेसीबी, पोकलेनव्दारे तसेच मनुष्यबळाव्दारे नाले सफाईचे काम दि. ३१ मेपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले आहेत. या बैठकीला सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता, महावितरणचे अधिकारी, मनपाचे अतिरिक्त आयुक्त, सर्व उपायुक्त, शहर अभियंता, सर्व कार्यकारी अभियंता, सर्व क्षेत्रीय अधिकारी, नगररचनाकार, अग्निशमन अधिकारी आणि सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

# भंगार जमा करणारेच निघाले चोर; इलेक्ट्रिक दुकानात चोरी करणाऱ्या २ महिलांसह तिघांना अटक



**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने इलेक्ट्रिक दुकान फोडून चोरी करणाऱ्या टोळीला जेरबंद केले. एवढेच नाही तर त्यांच्याकडून ३ लाख १ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी तीन आरोपींना अटक करण्यात आली असून, चार अल्पवयीन बालकांनाही ताब्यात घेण्यात आले आहे. हे चोरटे भंगार जमा करणारे निघाले.

भाग्यनगर पोलीस ठाण्यात कलम ३३१ (३), ३३१ (४), ३०५ बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या पथकामार्फत करण्यात आली. दि. १५ मे २०२६ रोजी मालेगाव रोडवरील कृष्णा ट्रेडर्स या इलेक्ट्रिक दुकानाचे शटर वाकवून अज्ञात चोरट्यांनी दुकानातील इलेक्ट्रिक साहित्याची चोरी केली होती. याबाबत २१ मे रोजी भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास सुरू असताना गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख यांना गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी मालेगाव रोड परिसरात

### तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

सापळा रचून संशयिताला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी चोरीची कबुली दिली. आरोपींकडून चोरीस गेलेले इलेक्ट्रिक साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणात गणेश साहेबराव नक्कलवाड (वय ३८), वैशाली रामचंद्र नक्कलवाड (वय २०)आणि सावित्रीबाई प्रकाश पानकोटे (वय ३१ सर्व रा. नंदीनगर, मुदखेड, जि. नांदेड) यांना अटक करण्यात आली आहे. तसेच चार अल्पवयीन बालकांनाही ताब्यात घेण्यात आले आहे.



**नांदेड** – तारासिंह मार्केट कॉर्नर येथील रोहित्राला आग लागून मोठे नुकसान झाले आहे. **(छाया : करणसिंह बैस, नांदेड)**

# अवैध व्यवसाय विरोधी मोहिमेत ५६ गुन्हे दाखल ७३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– १ ते ३१ मे दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या २० व्या दिवशी नांदेड परिक्षेत्रात मटका जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या एकूण १३ इसमांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत ११ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून ४३ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे अवैध दारू विक्री करणाऱ्या ३८ इसमांविरुद्ध ३६ गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून ४ लाख ८१ हजार ५४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर अवैध वाळू उपसा करणाऱ्या ३ इसमांविरुध्द २ गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून ५५ लाख१५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उपरोक्त कारवाई सोबतच शस्त्र अधिनियमान्वये २, कोटपा अन्वये २, तर इतर अधिनियमाखाली मिळून, एकूण ५६ कारवाया करण्यात आल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून एकूण ७३ लाख ९३ हजार ६३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या कारवाईत नांदेड शहरातील वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत पकडलेल्या ७२.०३ ग्रॅम ब्राऊन शुगरचा समावेश आहे.

# शहरात बालिकेवर अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका १५ वर्षीय बालिकेवर अत्याचार झाल्याचे वृत्त असून, या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणाची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने पावले उचलली आहेत. या प्रकरणातील सामील असलेल्या संशयित आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अल्पवयीन बालिकेवर अशा प्रकारे अत्याचार करणे हा एक अत्यंत क्रूर आणि नराधम प्रकारचा गुन्हा आहे. समाजात घडणाऱ्या अशा संवेदनशील घटना केवळ कायद्याचा प्रश्न नसून त्या सामाजिक आरोग्यासाठीही अत्यंत घातक ठरत आहेत. अशा घटनांमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, गुन्हेगाराला कठोरात कठोर शासन व्हावे, अशी मागणी जोर धरत आहे. वजिराबाद पोलिसांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन सविस्तर कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे.

# दोन लेकरांचा जीव घेणाऱ्या आईला ५ वर्षांची शिक्षा

**भोकर (प्रतिनिधी)** –आपल्या दोन चिमुकल्या मुलांची हत्या करून पुरावे नष्ट करणाऱ्या मातेला भोकरच्या सत्र न्यायालयाने ५ वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. आरोपी महिलेची मानसिक स्थिती आणि वैद्यकीय अहवाल विचारात घेऊन न्यायालयाने हा निकाल दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भोकर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील मौजे पांडूरणा येथील आरोपी आई धुरपताबाई गणपत निमलवाड हिची मुलगी अनसूया (वय ४ महिने) आणि मुलगा दत्ता (वय २ वर्षे) हे भुकेने व्याकूळ होऊन सतत रडत असल्याने ती वैतागली होती. याच रागातून तिने पोटच्या मुलांचा जीव घेण्याचे टोकाचे पाऊल उचलले. तिने मुलगी अनसूयाचे तोंड दाबून हत्या केली आणि तिचा मृतदेह गावातील पुलाखाली गाडला. तसेच मुलगा दत्ताच्या नाका-तोंडात चिखल कोंबून त्याचीही निर्घृण हत्या केली आणि त्याचा मृतदेह मुगट शिवारातील एका उसाच्या शेतात टाकला. त्यानंतर इतर आरोपींच्या मदतीने तिने दोन्ही मुलांचे मृतदेह पुन्हा काढून जाळून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी धुरपताबाईचे सासरे गोविंद दगडूजी निमलवाड यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली होती.

या खटल्यात सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता सौ. अनुराधा रेड्डी (डावरे) यांनी एकूण सहा साक्षीदार तपासले. आरोपीची मानसिक स्थिती स्थिर होती आणि तिला कृत्याची जाणीव होती, असा युक्तिवाद सरकारी पक्षाने केला होता. मात्र, सत्र न्यायाधीश मोहम्मद नासीर मोहम्मद सलीम यांनी आरोपीची मानसिक आजाराची पार्श्वभूमी आणि न्यायालयीन कोठडीतील वैद्यकीय अहवाल यांचा सखोल विचार केला. आई ही मनोरुग्ण असल्यामुळे तिला कलम ३०२ अंतर्गत शिक्षा वगळून निष्पाप मुलांचा जीव घेतल्यामुळे न्यायालयाने आरोपी आईस कलम ३०४ (भाग २) अंतर्गत ५ वर्षे सश्रम कारावास व १००० रुपये दंड आणि कलम २०१ (पुरावा नष्ट करणे) अंतर्गत २ वर्षे कारावास व १००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

# ऑनलाईन औषध विक्रीविरोधात भोकरमध्ये कडकडीत 'बंद'




**भोकर (प्रतिनिधी)** – देशभरात फोफावलेल्या 'ऑनलाईन औषध विक्री' व्यवसायामुळे राज्यातील आणि विशेषतः ग्रामीण भागातील छोट्या औषध विक्रेत्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. या अनिष्ट प्रकाराला आणि बेकायदेशीर औषध विक्रीला आळा घालण्याच्या मागणीसाठी, 'ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट अँड ड्रगिस्ट'च्या आवाहनानुसार भोकर येथील केमिस्ट असोसिएशनने गुरुवार, दि. २ मे रोजी एकदिवसीय देशव्यापी संपात सक्रिय सहभाग नोंदवला. शहरात या बंदला १०० टक्के प्रतिसाद मिळाल्याने दिवसभर सर्व औषध दुकाने बंद होती.

केमिस्ट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑनलाईन औषध विक्रीमुळे औषध व्यापाराचे नियम पायदळी तुडवले जात आहेत. प्रिस्क्रिप्शनशिवाय किंवा चुकीच्या पद्धतीने होणाऱ्या औषधांच्या पुरवठ्यामुळे सर्वसामान्यांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. तसेच या ऑनलाईन कंपन्यांमुळे स्थानिक पातळीवरील हजारो छोट्या औषध दुकानदारांच्या आर्थिक उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर झाला आहे.

या आंदोलनाचे नेतृत्त्व केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष राजू रेड्डी लोकावाड यांनी केले. यावेळी गजानन पाटील अडकिने, संजय नारलावार, पवन वानखेडे, साई येलुरे, दत्तू रेड्डी, विश्वास धात्रक, एजाज अहमद, भीमराव वाघमारे, आशफाख इनामदार, साईनाथ पद्मवार, जुनेद इनामदार आणि रमिजोदिन इनामदार यांच्यासह शहरातील इतर केमिस्ट बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मनपात दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त प्रतिज्ञेचे वाचन



**नांदेड (प्रतिनिधी)** –महानगरपालिकेतर्फे दि.२१ मे रोजी सकाळी ११ वाजता स्थायी सभागृह कक्षात दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्यासह उपस्थितांनी प्रतिज्ञेचे वाचन केले.

याप्रसंगी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपायुक्त अजितपालसिंघ संधू, वैद्यकीय अधिकारी हनमंत रिठ्ठे, शहर अभियंता सुमंत पाटील, कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर, संघरत्न सोनसळे, नगररचनाकार ओम लहाने, सिस्टीम मॅनेजर सदाशिव पतंगे, अग्निशमन अधिकारी केरोजी दासरे, सहायक आयुक्त मो.गुलाम सादिक, क्षेत्रिय अधिकारी रमेश चवरे, रावण सोनसाळे, गौतम कवडे, निलावती डावरे, राजेश जाधव यांच्यासह पालिकेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धम्मगिरी कॉलनीत विजेचा खेळखंडोबा

**नांदेड (प्रतिनिधी)** –गेल्या पाच-सहा दिवसांपासून तरोडा भागातील धम्मगिरी व सप्तगिरी कॉलनीतील डीपी नंबर १५२ अंतर्गत वीज ग्राहकांना सततच्या खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे गर्मीचा त्रास सहन करावा लागत आहे. विजेच्या खेळखंडोब्याकडे वरिष्ठांनी लक्ष देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

तरोडा भागातील १५२ क्रमांकाच्या डीपीची भयंकर दुरावस्था झाली आहे. यावर कायमस्वरूपी उपाययोजना न करता तात्पुरती डागडुजी महावितरण विभागाकडून केली जाते. त्यामुळे दिवसातून चार-पाच वेळा या भागातील वीजपुरवठा खंडित होत आहे. त्यातच कॉल सेंटरचा फोन नो रिप्लाय असतो. तर वरिष्ठ अधिकारी मोबाईलला प्रतिसाद देत नाहीत, अशी या भागातील रहिवाशांची ओरड आहे. कित्येक वेळा फ्युज दुरुस्त करून कर्मचारी कार्यालयात पोहोचण्याआधी पुन्हा त्यात बिघाड होत असल्याचे येथील नागरिक सांगतात.



भर उन्हाळ्यात ४३ डिग्री तापमानामुळे अगोदरच जनता उकाड्याने त्रस्त असताना विद्युत विभागाकडूनही हा नाहक तांत्रिक त्रास सहन करावा लागत आहे. शिवाय री-नीटचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. जर वीज बील भरले नाही तर एका क्षणात कोणतीही पूर्वकल्पना न देता वीजजोडणी बंद केली जाते, तीच तत्परता रिपेअरसाठी सुध्दा दाखवावी, अशी अपेक्षा या भागातील रहिवासी करत आहेत. या भागातील लोकप्रतिनिधींनी सामूहिक तक्रार वरिष्ठांकडे करण्यासाठी पुढाकार घ्यावा व या त्रासातून जनतेला कायमची मुक्ती द्यावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# लोहा नगर परिषदेच्या स्वीकृत सदस्यपदी श्याम पाटील व शंकर वट्टमवार यांची निवड

**लोहा (प्रतिनिधी)** – लोहा नगर परिषदेच्या दोन स्वीकृत सदस्यांची पीठासीन अधिकारी नगराध्यक्ष शरद पवार व सहायक म्हणून मुख्याधिकारी संदीप भोळे यांच्या उपस्थितीत करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे श्याम पाटील पवार व शंकर वट्टमवार यांची बिनविरोध निवड झाली.

लोहा नगर परिषदेच्या स्वीकृत सदस्य निवडीसाठी गुरुवार, दि. २१ मे रोजी सकाळी ११ वाजता पीठासीन अधिकारी म्हणून नगराध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली नगरसेवकांची विशेष बैठक पार पडली. सहायक म्हणून मुख्याधिकारी संदीप भोळे उपस्थित होते. या निवडीसाठी नगररचना अभियंता कृष्णा कठारे, अजिंक्य केंद्रे, सुतार यांनी सहकार्य केले. खरेदी विक्री संघाचे माजी उपसभापती श्याम पाटील पवार, शंकर वट्टमवार यांची निवड करण्यात आली.

निवड झाल्यानंतर दोन्ही नवनियुक्त सदस्य श्याम पाटील व शंकर वट्टमवार यांचा प्रवीण पाटील यांनी सत्कार केला. नगराध्यक्ष शरद पवार, युवा नेते सचिन पाटील चिखलीकर, उपनगराध्यक्ष करीमशेख, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, गटनेते भास्कर पवार यांच्यासह सर्व नगरसेवक, पदाधिकारी उपस्थित होते.

# पोचमपाड बॅक वॉटरग्रस्त शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**नांदेड (प्रतिनिधी)** –तेलंगणातील गोदावरी नदीवर असलेल्या पोचमपाड बॅक वॉटरग्रस्त शेतकऱ्यांनी गुरुवार, दि. २१ मे रोजी दुचाकीवरून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला आणि आपल्या विविध मागण्यांसंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

पोचमपाड बॅक वॉटरग्रस्त शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी गुरुवारी नायगाव ता. धर्माबाद येथून जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे दुचाकी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाचे नेतृत्व शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष डॉ. भगवानराव मनूरकर यांनी केले. या मोर्चामध्ये उमरी कृषी उत्पन्न बाजार



समितीचे सभापती शिरीष देशमुख गोरठेकर तसेच नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक व उमरी नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष कैलास देशमुख गोरठेकर यांनी स्वतः दुचाकीवर सहभागी होत शेतकऱ्यांच्या मागण्यांना जाहीर पाठिंबा दिला.

मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकल्यानंतर शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन प्रशासनाला देण्यात आले. त्यानंतर जुना मोंढा येथे मोर्चामध्ये सहभागी झालेल्या शेतकऱ्यांनी सोबत आणलेल्या भाजी- भाकरीच्या जेवणाचा सामूहिक आस्वाद घेत मोर्चाचा समारोप केला.

या मोर्चात धर्माबाद, बिलोली, नायगाव व उमरी तालुक्यातील शेतकरी बांधव आणि महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com